

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

पहिला दिवस
शैलपुत्री
मनातील भय दूर होवो,
नवी उमेद जागो...

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : रविवार, ११ ऑक्टोबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३०२ | किंमत : २ रूपये


**सोने-चांदी**
- ✔ २४ कॅरेट : १,५४,७०० /-
- ✔ २३ कॅरेट : १,४६,३५० /-
- ✔ चांदी : २,३८,३००/-


**Hotel Mai VilLa**
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

**सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...**
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६


**थोडक्यात**

## बुडून दोन सख्ख्या भावांचा मृत्यू

**नळदुर्ग :** धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यात असलेल्या निलेगाव शिवारातील पाझर तलावात बुडून दोन सख्ख्या भावांचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना शनिवारी (१० ऑक्टोबर) सकाळी अकराच्या सुमारास घडली. जनावरांना पाणी पाजण्यासाठी तलावावर गेलेले अजय संतोष राठोड (वय १२) आणि रोहन संतोष राठोड (वय ११) यांचा या दुर्घटनेत मृत्यू झाला. एकाच कुटुंबातील दोन चिमुकल्यांचा दुर्दैवी अंत झाल्याने निलेगावसह परिसरात शोककळा पसरली आहे. निलेगाव येथील सेवालाल नगर, तांडा क्रमांक एक येथे राठोड कुटुंब वास्तव्यास आहे. शनिवारी सकाळी अजय आणि रोहन हे दोघे भाऊ जनावरांना पाणी पाजण्यासाठी गावातील पाझर तलावावर गेले होते. बराच वेळ उलटूनही दोघे घरी परतले नाहीत. त्यामुळे त्यांचे वडील संतोष राठोड यांनी तलावाच्या दिशेने धाव घेतली.

# दिल्लीच्या आंदोलनाची संयुक्त राष्ट्राने घेतली दखल

- आंदोलकांना तात्काळ सोडा, संयम बाळगा, अधिकाऱ्यांना सूचना
- संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार कार्यालयाने आंदोलकांशी व्यवहार करताना अत्यंत संयम बाळगण्याचे आवाहन केले
- अटकेत असलेल्या सर्वांच्या सुटकेची मागणीही केली

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

दिल्लीतील 'कॉकरोच जनता पार्टी'च्या आंदोलनादरम्यान आंदोलकांना ताब्यात घेतल्याच्या प्रकरणावर संयुक्त राष्ट्राच्या मानवाधिकार कार्यालयाने चिंता व्यक्त केली आहे. भारतीय अधिकाऱ्यांना शांततापूर्ण एकत्र येण्याच्या अधिकाराचा आदर करण्याचे आणि मनमानीपणे ताब्यात घेतलेल्यांना तात्काळ सोडण्याचे आवाहन केले आहे. जंतर मंतरच्या दिशेने मोर्चा काढणाऱ्या हजारो आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते, परंतु नंतर अनेकांना सोडून देण्यात आले.

संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार कार्यालयाचे प्रवक्ते थमिम अल-खैथान म्हणाले की, दिल्लीतील आजच्या मोठ्या निदर्शनांपूर्वी आणि दरम्यान आंदोलक, चळवळीचे नेते, नागरी समाजाचे सदस्य, वकीलांना मोठ्या प्रमाणावर ताब्यात घेतल्याच्या वृत्तांमुळे ते चिंतित आहेत. आम्ही अधिकाऱ्यांना शांततापूर्ण एकत्र येण्याच्या अधिकाराचा पूर्णपणे आदर करण्याचे आणि तो सुनिश्चित करण्याचे आवाहन करतो," असे निवेदनात म्हटले आहे.




### कोणत्याही अटींशिवाय सुटका झालीच पाहिजे: संयुक्त राष्ट्र

अल-खैथान यांनी भारतीय अधिकाऱ्यांना आवाहन केले की, शांततापूर्ण आंदोलकांशी वागताना कायदा अंमलबजावणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी अत्यंत संयम बाळगावा. हे देशाच्या लोकशाही परंपरा आणि मानवाधिकारांप्रति असलेल्या वचनबद्धतेशी सुसंगत असले पाहिजे. ज्यांना मनमानीपणे ताब्यात घेण्यात आले आहे, त्या सर्वांची तात्काळ आणि कोणत्याही अटींशिवाय सुटका झाली पाहिजे."

सीजेपीने दिल्लीतील एक प्रमुख स्थळ असलेल्या जंतर मंतर येथे आंदोलन करण्याची योजना आखली होती, परंतु पोलिसांनी परवानगी नाकारली. कडक सुरक्षा व्यवस्था आणि रस्त्यावरील अडथळ्यांमुळे बहुतेक आंदोलकांना त्या परिसरात पोहोचता आले नाही. सीजेपीने कळवले आहे की, त्यांचे संस्थापक अभिजीत दीपके आणि त्यांचे सहकारी सौरभ दास व आशुतोष रांका यांना मुंबईहून दिल्लीला येणाऱ्या विमानातून उतरताच ताब्यात घेण्यात आले. दिल्ली पोलिसांनी त्यांच्या अटकेवर कोणतीही सार्वजनिक प्रतिक्रिया दिलेली नाही.

### सीजेपी आज पुन्हा आंदोलन करणार

'कॉकरोच जनता पार्टी'ने म्हटले आहे की, जोपर्यंत ज्ञानेश कुमार राजीनामा देत नाहीत, तोपर्यंत आंदोलन सुरूच राहील. सीजेपीने रविवारी ११ ऑक्टोबर सकाळी १० वाजता जंतर मंतरवर आणखी एका आंदोलनाची घोषणा केली आहे. दरम्यान, दिल्ली वाहतूक पोलिसांनी नवी दिल्ली आणि मध्य दिल्लीत संभाव्य निर्बंधांबाबत इशारा दिला आहे.

सीजेपीचे राष्ट्रीय संघटन प्रभारी अजिंक्य शिंदे म्हणाले, आज ताब्यात घेतल्यानंतर आम्ही घरी परत जाऊ, असा विचार सरकारने केला असेल. मोदी आणि शाह यांची ही भीती दाखवते की आम्ही अर्धी लढाई जिंकली आहे.

तुम्ही पाहिजे तितक्या लोकांना ताब्यात घ्या, पण जोपर्यंत ज्ञानेश कुमार राजीनामा देत नाहीत तोपर्यंत आम्ही मागे हटणार नाही. आम्ही उद्या सकाळी १० वाजता पुन्हा जंतर मंतरवर जाऊ. त्यांनी लोकांना मोठ्या संख्येने आंदोलनात सामील होण्याचे आणि पोलिसांनी अडवले तरी आंदोलन सुरू ठेवण्याचे आवाहन केले.

## सर्वोच्च न्यायालयातील १०० वकिलांना पोलिसांनी घेतले ताब्यात

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

दिल्लीतील जंतरमंतर येथील कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनापूर्वी सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली असून दिल्ली पोलिसांनी सर्वोच्च न्यायालयाच्या परिसरातून अनेक वकिलांना ताब्यात घेतले आहे. ताब्यात घेतलेल्या वकिलांमध्ये सर्वोच्च न्यायालयातील अँडव्होकेट सुमिता हजारिका यांचाही समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. या कारवाईमुळे खळबळ उडाली असून बार असोसिएशनने थेट सरन्यायाधीशांकडे धाव घेतली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या परिसरात तसेच वकिलांच्या चेंबर्सजवळ काही वकिलांना पोलिसांनी अडवले आणि त्यानंतर त्यांना चिलखती वाहनातून घेऊन गेल्याचा आरोप करण्यात आला आहे. पोलिसांनी जवळपास १०० वकिलांना ताब्यात घेऊन यमुना स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे हलवल्याचा दावा करण्यात आला आहे. यामध्ये सर्वोच्च न्यायालय आणि दिल्ली उच्च न्यायालयाच्या वकिलांचा समावेश आहे. मात्र, ताब्यात घेतलेल्या वकिलांची नेमकी संख्या स्वतंत्रपणे पडताळता आलेली नाही.



वकिलांना ताब्यात घेण्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांनी या कारवाईबाबत अधिकृत स्पष्टीकरण दिल्याची माहितीही उपलब्ध नाही. मात्र बार आणि बेंचने आपल्या एक्स अकाऊंटवर याचे फोटो आणि व्हिडीओ शेअर केले आहेत. तसेच कारवाईत सहभागी असलेल्या दोन पोलीस कर्मचा-यांच्या गणवेशावर नावाचे बिल्ले नसल्याचे समोर आले आहे.

### वकिलांवर बळाचा वापर केल्याचा आरोप

या घटनेवर बार असोसिएशनने तीव्र संताप व्यक्त केला आहे. बार असोसिएशनने सरन्यायाधीश सूर्य कांत यांना तातडीने पत्र लिहून या प्रकरणात हस्तक्षेप करण्याची मागणी केली. पोलिसांनी शांततापूर्ण मार्गाने जाणा-या वकिलांवर बळाचा वापर करून त्यांना जबरदस्तीने ताब्यात घेतले. ही बाब अत्यंत गंभीर असून सरन्यायाधीशांनी स्वतः याची दखल घ्यावी असे बार असोसिएशनने पत्रात म्हटले.

## केजरीवाल, ममता बॅनर्जी, ध्रुव राठी ते अभिजीत दिपके जेरबंद

**वृत्तसंस्था, मुंबई**

राज्यात एकीकडे एमपीएससी विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू असताना दुसरीकडे राजधानी दिल्लीतील जंतरमंतरवर कॉकरोच जनता पार्टीने आंदोलनाची हाक दिली आहे. त्यासाठी, संस्थापक अभिजीत दिपकेंसह सीजेपीचे पदाधिकारी दिल्लीत पोहोचले असता पोलिसांनी सर्वांना विमानातूनच ताब्यात घेतलं. मात्र, दुसरीकडे दिल्लीच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात जेन-झी, विद्यार्थी संघटना आणि विरोधी पक्षातील पदाधिकारीही उतरल्याचं पाहायला मिळत आहे. त्याच पार्श्वभूमीवर पोलिसांनी धरपकड सुरू केली असून बड्या नेत्यांना स्थानबद्ध केलं आहे.

एसआयआर रद्द करणे आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सीजेपीने आज दिल्लीत आंदोलनाची हाक दिली होती. तर, काँग्रेससह इंडिया आघाडीच्या प्रमुख नेत्यांनीही कालच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेऊन ज्ञानेश कुमारांविरुद्ध निवेदन दिले आहे. त्याच, पार्श्वभूमीवर आज सीजेपीच्या आंदोलनात जेन-झीसह विद्यार्थी संघटनांचे पदाधिकारीही सहभागी झाल्याचं दिसून आलं. त्यामुळे, दिल्ली पोलिसांनी निमलष्कर दलासह पोलिसांचा फौजफाटा रस्त्यावर उतरवला असून अनेकांना ताब्यात घेण्यात आलंय.

आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल, तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी, युट्यूबर ध्रुव राठी ते सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपकेंसह अनेकांना दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. विशेष म्हणजे, मुंबईतही महात्मा गांधींचे नातू तुषार गांधी यांना मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतलं असून डीएन नगर पोलीस ठाण्यात स्थानबद्ध करण्यात आलंय.

आत्तापर्यंत दिल्ली पोलिसांनी १७०० हून अधिक आंदोलकांना जेरबंद केल्याची माहिती आहे. मात्र, अद्यापही आंदोलनाचा जोर वाढत असून दिल्लीत सरकारविरोधात विरोधी पक्षांचाही संताप पाहायला मिळत आहे.

## सालाई फाट्याजवळ भीषण अपघात, पती-पत्नीचा मृत्यू




**केळवद पोलीस स्टेशनच्या हद्दीतील घटना**

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

सकाळी ९:१५ वाजता केळवद पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या सालाई फाट्याजवळ फॉर्च्युनर कार आणि दुचाकीची भीषण धडक होऊन पती-पत्नीचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, फॉर्च्युनर कार क्रमांक MH-31-FR-9561 ही नागपूरहून पांढुर्णा दिशेने जात होती, तर अँक्टिव्हा दुचाकी क्रमांक MH-40-DF-3287 ही सालाईकडून नागपूरच्या दिशेने जात होती. याचदरम्यान दोन्ही वाहनांची धडक होऊन गंभीर अपघात घडला.

अपघाताची माहिती मिळताच हितज्योती आधार फाउंडेशनची टीम, महामार्ग सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत कोळी आणि केळवद पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. हितेश बनसोड यांच्या मदतीने दोन्ही गंभीर जखमींना उपचारासाठी सावनेर येथील शासकीय रुग्णालयात आणण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती दोघांनाही मृत घोषित केले.

मृतांची नावे पुढीलप्रमाणे आहेत. डोमाजी चामादेव धुंदे (वय ६५ वर्षे), प्रमिला डोमाजी धुंदे (वय ४९ वर्षे) मिळालेल्या माहितीनुसार, डोमाजी धुंदे हे पोलीस खात्यात कार्यरत होते आणि सध्या सेवानिवृत्त झाले होते. या दुर्दैवी घटनेनंतर दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले आहेत.

## काँग्रेसची मोठ्या आंदोलनाची तयारी?

### सर्व आमदार, खासदारांना दिल्लीत बोलवले, सरकारविरुद्ध चळवळ पेटणार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दिल्लीत आणि मुंबईतही आजचा दिवस गाजला तो एसआयआर आणि मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याची मागणी करत सुरू असलेल्या आंदोलनाने. कॉकरोच जनता पार्टीर्चे संस्थापक अभिजीत दिपकेंनी आज दिल्लीतील जंतरमंतरवर आंदोलनाची घोषणा केली होती. त्यासाठी, अभिजीत दिपकेंसह त्यांचे साथीदार विमानाने दिल्लीत पोहोचले. मात्र, विमानतळावरच महिला पोलिसांनी अभिजीत दिपकेंना ताब्यात घेतलं. त्यामुळे, आंदोलनाची धुरा अजिंक्य शिंदे यांच्याकडे आली. मात्र, या घटनेनंतर विरोधी पक्षातील नेते आक्रमक झाले आहेत. दिल्ली पोलिसांनी काही नेत्यांनाही ताब्यात घेतलं. त्यानंतर, आता काँग्रेसने दिल्लीत मोठं आंदोलन उभारण्याची तयारी सुरू केली आहे.

काँग्रेसकडून राज्यात आणि दिल्लीत सरकारच्या विरोधात मोठे आंदोलन उभे करण्याची तयारी सुरू आहे. त्याच पार्श्वभूमीवर देशातील काँग्रेसच्या सर्व आमदार, खासदार आणि वरिष्ठ नेत्यांना दिल्लीत उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. उद्या संध्याकाळपर्यंत सर्वच आमदार-खासदारांनी दिल्लीमध्ये उपस्थित राहावे, असे निर्देशच पक्षनेतृत्वाने दिले आहेत. विशेष म्हणजे, केवळ महाराष्ट्रच नाही, तर सर्व राज्यांच्या प्रदेशाध्यक्षांनाही दिल्लीत उपस्थित राहण्यासाठी सांगण्यात आलं आहे. त्यामुळे, पुढील काळात काँग्रेसह इंडिया आघाडीचं सरकारविरोधात मोठं आंदोलन उभं राहण्याची शक्यता आहे.



देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी मुंबईतील ऑगस्ट क्रांती मैदानावर आज सीजेपीने आंदोलनाची हाक दिली होती. येथे आंदोलक जमा होण्यास सुरुवात होताच पोलिसांनी धरपकड सुरू केली. पोलिसांनी मुंबईतील अनेक भागात विविध पक्षाच्या कार्यकर्त्यांना ताब्यात घेतलं. विशेष म्हणजे, सीजेपीच्या आंदोलनासाठी जात असलेल्या महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांना देखील पोलिसांनी अंधेरी पश्चिमेकडील डी.एन नगर पोलीस ठाण्यामध्ये डिटेन केले होते. त्यानंतर, डी.एन. नगरपोलीस ठाण्याबाहेर मोठ्या प्रमाणावर शिवसेना आणि काँग्रेस कार्यकर्ते गोळा झाले. या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त देखील तैनात करण्यात आला आहे. तर, खासदार संजय राऊत आणि आमदार आदित्य ठाकरे हेही डीएन नगर पोलीस ठाण्यात पोहोचले होते. जोपर्यंत तुषार गांधी यांची सुटका होत नाही, तोपर्यंत पोलीस स्टेशन सोडणार नाही, असा इशारा आदित्य यांनी दिला होता.

नाशिकमध्ये ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले, विविध संघटना आणि राजकीय पक्षांचे कार्यकर्ते आंदोलनात सहभागी होते. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात होता, आंदोलन करणाऱ्या काही कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यातही घेतले. शहरातील अशोक स्तंभ, महात्मा गांधी रोड ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापर्यंत मोर्चा काढण्यात आला. दुसरीकडे नागपूरमध्येही ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत आंदोलक रस्त्यावर उतरल्याचं दिसून आलं.

संपादकीय लेखणीतून...

## पत्र पत्रिकांना मोल कागदी

जागतिक टपाल दिन दरवर्षी ९ ऑक्टोबरला साजरा केला जातो. सन १८७४ मध्ये यूनिव्हर्सल पोस्टल युनियन स्थापन करण्यात आले, ज्यामुळे जागतिक टपाल प्रणालीची सुरुवात झाली. टपाल सेवा ही लोकांपर्यंत माहिती पोहोचवण्यासाठी, संवाद साधण्यासाठी आणि व्यवसायिक व्यवहारांसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. ई-मेल आणि डिजीटल संवादाच्या युगात देखील टपाल सेवा विश्वासार्ह आणि किफायतशीर राहिली आहे. टपाल सेवांमुळे ग्रामीण भागांमध्ये देखील माहिती आणि वस्तू पोहोचवणे सोपे झाले आहे. मात्र टपाल खात्याची हीच लोकप्रिय सेवा सद्या ढेपाळलेली दिसत आहे. पूर्वी साधे पोस्टकार्ड सुद्धा नेमक्या पत्त्यावर हमखास पोहोचविले जात असत. आता त्याची पोस्टमनच हातोहात विल्हेवाट लावतो की काय? काहीच कळत नाही. साप्ताहिक, मासिक वा पाक्षिक पत्रिकाबाबत पत्रिका कार्यालयाकडे विचारणा केली असता त्या संबंधित पत्रिका विभागातून वेळीच पोस्ट केल्याची माहिती मिळते मात्र अनेक महिने उलटूनही त्या शेवटी अप्राप्तच राहतात. त्यामुळे ग्राहकांचा संशय गडद होतो की, पत्रिका कचरापेटीत फेकल्या गेल्या. पत्ता शोधत हिंडण्याची कटकट नको म्हणून पोस्टमन त्या परस्पर कचऱ्यात टाकतात, विचारले तर "आलीच नाही" असा आव आणतात, हे खरे वास्तव आहे.

९ ऑक्टोबर १८७४ रोजी स्वित्जरलँडची राजधानी बर्न येथे 'युनिव्हर्सल पोस्टल युनियन' (वढव) ची स्थापना झाली. घोषणाः जपानमधील टोकियो येथे सन १९६९ मध्ये भरलेल्या संमेलनात ९ ऑक्टोबर हा दिवस "जागतिक टपाल दिन" म्हणून जाहीर करण्यात आला. भारतातील टपाल सेवाः भारतात १ ऑक्टोबर १८५४ रोजी अधिकृत टपाल विभागाची स्थापना झाली. भारत दि. १ जुलै १८७६रोजी युनिव्हर्सल पोस्टल युनियनचा पहिला आशियाई सदस्य बनला. मोबाईल आणि इंटरनेट येण्यापूर्वी दूरवरच्या व्यक्तीपर्यंत सुख-दुःख व संदेश पोहोचवण्याचे टपाल हे एकमेव विश्वासू साधन होते. दुर्गम भागातील जाळेः आजच्या डिजिटल युगातही भारतीय टपाल खात्याने गावखेड्यांपासून ते अगदी दुर्गम भागापर्यंत आपले सेवा जाळे टिकवून ठेवले आहे. भारतीय टपाल सेवा ही केवळ पत्रे पोहोचवत नाही, तर अल्प बचत योजना, पार्सल सेवा आणि बँकिंग सुविधा सुद्धा पुरवते.

टपालसेवा किंवा पोस्ट ही पोस्टकार्ड, पत्रे आणि पार्सल भौतिकरित्या वाहतूक करणारी एक प्रणाली आहे. टपाल सेवा खाजगी किंवा सार्वजनिक असू शकते, जरी अनेक सरकार खाजगी प्रणालींवर निर्बंध घालतात. १९ व्या शतकाच्या मध्यापासून, राष्ट्रीय टपाल प्रणाली सामान्यतः सरकारी मक्तेदारी म्हणून स्थापित केली गेली आहे, ज्यामध्ये लेखाच्या प्रीपेड शुल्कासह. पेमेंटचा पुरावा सहसा चिकट टपाल तिकिटाच्या स्वरूपात असतो, परंतु टपाल मीटरचा वापर मोठ्या प्रमाणात मेलिंगसाठी देखील केला जातो. ईमेलच्या आगमनाने, "स्नेल मेल" हे प्रतिशब्द तयार झाले. पोस्टल अधिकाऱ्यांची अनेकदा पत्रे वाहतूक करण्याशिवाय कार्ये असतात. काही देशांमध्ये एक पोस्टल, टेलिग्राफ आणि टेलिफोन सेवा, टेलिफोन आणि टेलिग्राफ प्रणाली व्यतिरिक्त टपाल प्रणालीवर देखरेख करते. काही देशांच्या पोस्टल सिस्टम बचत खाती आणि पासपोर्टसाठी अर्ज हाताळण्यास परवानगी देतात. सन १८७४ मध्ये स्थापन झालेल्या युनिव्हर्सल पोस्टल युनियन मध्ये १९२ सदस्य देशांचा समावेश आहे आणि संयुक्त राष्ट्रांची एक विशेष एजन्सी म्हणून आंतरराष्ट्रीय मेल एक्सचेंजसाठी नियम सेट करते.

मौर्य साम्राज्य अंतर्गत आर्थिक वाढ आणि राजकीय स्थैर्याने प्राचीन भारतातील नागरी पायाभूत सुविधांच्या निरंतर विकासाला चालना दिली. मौर्य लोकांनी सुरुवातीच्या काळात भारतीय मेल सेवा तसेच सार्वजनिक विहिरी, विश्रामगृहे आणि लोकांसाठी इतर सुविधा विकसित केल्या. डगना नावाचे सामान्य रथ काहीवेळा प्राचीन भारतात मेल रथ म्हणून वापरले जात होते. धावपटू आणि इतर वाहकांद्वारे माहिती वितरीत करण्यासाठी राजे आणि स्थानिक राज्यकर्त्यांद्वारे कुरिअरचा लष्करी वापर केला जात असे. पोस्टमास्टर, गुप्तचर सेवेचे प्रमुख, कुरिअर प्रणालीची देखभाल सुनिश्चित करण्यासाठी जबाबदार होते. कुरिअर्सचा वापर वैयक्तिक पत्रे वितरीत करण्यासाठी देखील केला जात असे. दक्षिण भारतात म्हैसूर राज्याच्या वोडेयार राजघराण्याने हेरगिरीच्या उद्देशाने मेल सेवेचा वापर केला आणि त्याद्वारे मोठ्या अंतरावर घडलेल्या प्रकरणांशी संबंधित ज्ञान प्राप्त केले. १८ व्या शतकाच्या अखेरीस भारतात टपाल व्यवस्था कार्यरत होती.

# नरेंद्र मोदी : २५ वर्षे धोरणात्मक धाडस आणि जागतिक नेतृत्वाची

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

भारतीय लोकशाही आणि राजकीय इतिहासात ७ ऑक्टोबर २००१ हा दिवस एका नव्या युगाची नांदी मानला जातो. याच ऐतिहासिक तारखेला नरेंद्र मोदी यांनी पहिल्यांदा गुजरात राज्याचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली होती. तिथून सुरू झालेला हा राजकीय आणि प्रशासकीय प्रवास आज देशाच्या सर्वोच्च पंतप्रधानपदापर्यंत आणि एका अत्यंत प्रभावशाली जागतिक नेतृत्वापर्यंत पोहोचला आहे. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी त्यांच्या या अखंड आणि अविरत राजकीय नेतृत्वाला, ज्यामध्ये मुख्यमंत्री आणि पंतप्रधान या दोन्ही घटनात्मक पदांचा समावेश आहे, यशस्वी २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. एका सामान्य कार्यकर्त्यापासून सुरू झालेला हा प्रवास एका प्रबळ इच्छाशक्तीचा, अथक परिश्रमाचा आणि अफाट राष्ट्रभक्तीचा एक अतुलनीय आविष्कार आहे.

१४० कोटी देशवासीयांचे नेतृत्व करताना, या ऐतिहासिक तारखेचे स्मरण करत त्यांनी नुकतेच जनतेसमोर नतमस्तक होत आपण कायम लोकशाहीचे आणि जनतेचे सेवकच राहू इच्छितो, अशी अत्यंत विनम्र भावना व्यक्त केली आहे.

जेव्हा त्यांनी ७ ऑक्टोबर २००१ रोजी मुख्यमंत्री पदाची सूत्रे हाती घेतली, तेव्हा त्यांच्यासमोर गुजरातला विनाशकारी भूकंपाच्या धक्क्यातून सावरण्याचे अत्यंत मोठे आणि बिकट आव्हान होते. संपूर्ण प्रशासन आणि अर्थव्यवस्था कोलमडली होती. मात्र, आपल्या अचूक आणि धडाडीच्या प्रशासकीय कौशल्याने त्यांनी केवळ राज्याला सावरलेच नाही, तर विकासाच्या एका नव्या आणि प्रगत मार्गावर नेऊन ठेवले. जनतेने त्यांच्या या पारदर्शक कारभारावर अपार विश्वास ठेवून २००२, २००७ आणि २०१२ अशा सलग ३ विधानसभा निवडणुकांमध्ये त्यांना प्रचंड बहुमताने विजयी केले. या काळात त्यांनी वीज, शेती, पाणी व्यवस्थापन आणि उद्योगांना विकासाच्या केंद्रस्थानी ठेवले. २००३ मध्ये सुरू झालेली 'ज्योतीग्राम योजना' ज्यातून गावांना २४ तास वीज मिळाली, प्रशासनाला गती देणारी 'ई-ग्राम' योजना आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणूक वाढवण्यासाठी २००३ मध्ये सुरू केलेले 'व्हायब्रंट गुजरात' संमेलन इतके यशस्वी ठरले की, 'गुजरात मॉडेल' ही संपूर्ण देशात विकासाची, सुशासनाची आणि प्रगतीची एक नवी ओळख बनली.

या विकासकामांची आणि त्यांच्या दूरदृष्टीची चर्चा गुजरातच्या सीमा ओलांडून संपूर्ण देशभरात पोहोचली. २०१२ आणि २०१३ च्या सुमारास संपूर्ण देशाला एका नव्या आणि खंबीर नेतृत्वाची आस लागली होती, जे देशाला धोरणात्मक लकव्यातून बाहेर काढू शकेल. लोकांचे सल्ले ऐकून त्यावर त्वरित निर्णय घेणारा हा नेता देशाला नव्या उंचीवर नेईल, असा विश्वास जनतेला वाटू लागला. जनतेचा हा वाढता कल आणि मागणी पाहून २०१३ मध्ये गोव्यात झालेल्या पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत त्यांना अधिकृतपणे पंतप्रधानपदाचा चेहरा म्हणून घोषित करण्यात आले. याच वर्षी २०१३ मध्ये आग्रा येथून त्यांच्या शंखनाद सभेची सुरुवात झाली आणि संपूर्ण देशात एका नव्या राजकीय लाटेचा उदय झाला. जनतेच्या याच अफाट प्रेमामुळे आणि विश्वासाच्या बळावर २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत ते पूर्ण बहुमताने देशाचे पंतप्रधान झाले. संसदेत प्रवेश करण्यापूर्वी लोकशाहीच्या मंदिराच्या पायऱ्यांवर नतमस्तक होणे आणि आपल्या पहिल्या शपथविधी सोहळ्यासाठी शेजारील देशांच्या प्रमुखांना आमंत्रित करणे, या कृतींमधून त्यांनी आपल्या व्यापक, सांस्कृतिक आणि सर्वसमावेशक नेतृत्वाची चुणूक संपूर्ण जगाला दाखवून दिली.

पंतप्रधानपदाच्या या प्रदीर्घ कार्यकाळात त्यांनी अनेक ऐतिहासिक आणि साहसिक निर्णय घेतले. सत्तेत आल्यावर केवळ राजकीय गणिते न मांडता त्यांनी 'सबका साथ, सबका विकास' हा मंत्र दिला. 'जन धन योजना', 'स्वच्छ भारत अभियान', 'उज्वला योजना' आणि 'आयुष्मान भारत' यांसारख्या योजनांमधून त्यांनी तळागाळातील करोडो गरिबांचे जीवनमान उंचावले. २०१९ मध्ये जनतेने त्यांना पुन्हा एकदा सलग आणि आधीपेक्षा मोठा जनादेश दिला. या दुसऱ्या पर्वात त्यांनी अनेक दशकांपासून प्रलंबित असलेले धाडसी निर्णय घेतले. जम्मू-काश्मीरमधील कलम ३७० हटवणे, तिहेरी तलाक प्रथा रद्द करणे, वस्तू आणि सेवा कर प्रणाली (जीएसटी) लागू करणे आणि अयोध्येत प्रभू श्री रामचंद्रांच्या भव्य मंदिराच्या उभारणीचा मार्ग मोकळा करणे, हे निर्णय त्यांच्या राजकीय इच्छाशक्तीचे सर्वोच्च प्रतीक ठरले. २०२४ मध्ये सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी विराजमान होऊन त्यांनी आणखी एक नवा इतिहास रचला आहे.

आज त्यांच्या नेतृत्वाखाली भारताने विज्ञानात आणि अर्थव्यवस्थेत गगनभरारी घेतली आहे. चांद्रयान-३ चे चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वी लँडिंग असो, किंवा युपीआय प्रणालीद्वारे झालेली डिजिटल क्रांती असो, भारत आज तंत्रज्ञानात जगाचे नेतृत्व करत आहे.

आजकालच्या आंतरराष्ट्रीय प्रसारमाध्यमांमध्ये आणि जागतिक राजकारणात त्यांची ओळख केवळ एका देशाचे नेते एवढीच मर्यादित राहिलेली नाही, तर जगातील सर्वात लोकप्रिय आणि प्रभावशाली नेत्यांपैकी एक म्हणून ते प्रस्थापित झाले आहेत. प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय मासिकांनी त्यांच्या जागतिक प्रभावाची आणि लोकप्रियतेची वारंवार दखल घेतली आहे. आंतरराष्ट्रीय सर्वेक्षण संस्थांच्या अहवालानुसार ते सातत्याने जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेते ठरले असून, त्यांचा स्वीकृती दर अनेकदा ७५ टक्क्यांच्या घरात राहिला आहे. त्यांच्या परराष्ट्र धोरणाचे आणि जागतिक योगदानाचे फळ म्हणून फ्रान्स, संयुक्त अरब अमिराती, रशिया, सौदी अरेबिया, इजिप्त यांसारख्या अनेक देशांनी त्यांना आपले सर्वोच्च नागरी सन्मान देऊन गौरवले आहे. यासोबतच संयुक्त राष्ट्रांचा पर्यावरणासाठीचा सर्वोच्च पुरस्कारही त्यांना मिळाला आहे.

आंतरराष्ट्रीय मंचांवर भारताचा आणि पर्यायाने जगातील विकसनशील देशांचा आवाज आज अतिशय बुलंद झाला आहे. भारताने यशस्वीरीत्या भूषवलेले जी-२० परिषदेचे अध्यक्षपद आणि "वसुधैव कुटुम्बकम्" हा जगाला दिलेला सर्वसमावेशक संदेश त्यांच्या कुशल मुत्सद्देगिरीचे मोठे यश मानले जाते. कोविड-१९ महामारीच्या अत्यंत कठीण काळात भारताने राबवलेली 'लस मैत्री' मोहीम आणि १०० हून अधिक देशांना केलेली वैद्यकीय मदत जागतिक स्तरावर प्रचंड गाजली. आज जिहादी मानसिकतेत अडकलेले काही शेजारी देश आर्थिकदृष्ट्या खूप मागे राहिले आहेत, तर दुसरीकडे भारत जगातील प्रमुख अर्थव्यवस्था बनून एका जागतिक महासत्तेच्या दिशेने झेपावत आहे.

"सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास", "आत्मनिर्भर भारत" आणि "२०४७ पर्यंत विकसित भारत" या महत्त्वाकांक्षी आणि राष्ट्र उभारणीच्या ध्येयांच्या दिशेने देश त्यांच्या नेतृत्वाखाली अतिशय वेगाने वाटचाल करत आहे. जोपर्यंत त्यांच्यात हा अफाट करिश्मा, कठोर निर्णय घेण्याची असामान्य क्षमता आणि जनतेची अपार स्वीकृती आहे, तोपर्यंत त्यांची ही जनसेवेची वाटचाल अशीच अखंडपणे सुरू राहील. त्यांच्या या २५ वर्षांच्या अथक राजकीय प्रवासाचे, देशासाठी केलेल्या त्यागाचे आणि न थकता काम करण्याच्या अफाट ऊर्जेचे वर्णन या ओळींतून अतिशय अचूकपणे करता येईलः

"कसे सांगू की मी आता थकलो आहे,
न जाणे किती जणांचा
जगण्याचा आधार आहे मी...
थांबणे माज्या रक्तात नाही,
अन् विश्रांती मला मंजूर नाही,
मातृभूमीच्या सेवेचे हे व्रत, मी
श्वास असेपर्यंत सोडणार नाही.
आव्हानांची कितीही वादळे आली, तरी हे पाऊल कधी डळमळणार नाही,
१४० कोटी देशवासीयांचा दृढ विश्वास, हीच माझी खरी ताकद आहे. स्वप्न 'विकसित भारताचे' पूर्ण करण्यासाठी, माझा प्रत्येक क्षण आणि प्रत्येक श्वास केवळ या देशासाठी समर्पित आहे !"

– ९५६१५९४३०६

## देशाचे क्रांतिवीर नटसम्राट व युवकांना नवी दिशा देणारे महान युगपुरुष : नाना पाटेकर

रमेश लांजेवार
नागपूर

दिनांक ८ ऑक्टोबर २०२६ ला अचानक नाना पाटेकर यांची प्राणज्योत मावळली व नाना नावाचं वादळ एकाएकी शांत झाले. यामुळे सर्वत्र शोककळा पसरली. नाना पाटेकर यांचे कार्य ना भुतो ना भविष्यती अशाप्रकारचे आहे.कारण त्यांच्या प्रत्येक चित्रपटातुन कुठे क्रांतीची ज्योत, शिक्षणाचा प्रवाह, सर्वसामान्यांच्या समस्या, अत्याचार व भ्रष्टाचाराविरुद्धचा लढा धगधगतांना दिसत होता. त्यांची चित्रपटसृष्टीत काम करण्याची शैली आगळीवेगळी होती त्यामुळे त्यांचा स्वभाव शांत जरी असला तरी त्यांची कार्यशैली आक्रमक स्वरूपाची होती. कारण त्यांच्या चित्रपटातील डॉयलॉग, हावभाव अविस्मरणीय होत्या. त्यामुळे प्रेक्षकांचे मन ताबडतोब जिंकण्याची क्षमता त्यांच्यात अफाट असल्याने महाराष्ट्रासह संपूर्ण देश त्यांच्यावर प्रेम करायचा त्यामुळे त्यांचे आतापर्यंतचे संपूर्ण कार्य वाखाणण्याजोगे आहेत.

नाना पाटेकर देशाचे सुप्रसिद्ध अभिनेता व नटसम्राट होते खरे परंतु त्यांचे रहाणीमान अत्यंत साध्यापणाचे होते त्यांच्यात कोणत्याही प्रकारचा गर्व किंवा घमंड किंवा द्वेषभावना असा कोणताही प्रकार त्यांच्यात नव्हता. त्याच्या प्रत्येक चित्रपटातुन देशभक्तीची ज्वाला, आपुलकी भावना, समानतेची जोत व एकतेचे प्रतीक संपूर्ण देशभर हवेसारखे पसरले होते. त्यामुळे आज त्यांच्या निधनाने संपूर्ण देश शोकाकुल झाला आहे. त्यांचा सर्वात जास्त भर सामाजिक संस्थांना भेट देऊन त्यांना आर्थिक मदत करून समाज कार्य करायचे व त्यांच्या अडीअडचणी जाणून घेणे आणि गोरगरीबांची सेवा करणे हा होता. नानाजी राजकारणापासुन कोसो दूर राहून समाज कार्य करायचे. समाजकार्याच्या माध्यमातून त्यांनी राज्यासह देशातील संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांना मन जिंकले व आपलेसे केले. त्यामुळे देशातील प्रत्येक राजकीय पुढारी नाना पाटेकरांचा मानसन्मान करायचे. त्याचप्रमाणे नेहमीच गावखेडे, सामाजिक संस्था, अतिदुर्गम भाग अशा ठिकाणी नेहमीच भेट देऊन देश सेवा करीत असल्याने महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीला आपलेसे करून घेतले होते. मिडियाच्या माध्यमातून त्यांनी राज्यासह देशवासीयांशी अनेकदा संवाद सुध्दा साधला व देशवासीयांना आपलसं करून घेतले.कारण त्यांचे मार्गदर्शन नेहमीच समाज हिताचे व देश हिताचे रहाचे. परंतू सुप्रसिद्ध अभिनेता नाना पाटेकर अचानक आपल्यातून गेल्याने सर्वांना मार्गदर्शन करणारा आणि शिकवण देणारा नटसम्राट आज पडद्याआड गेला व संपूर्ण देश शोकाकुल झाला आहे. कारण त्यांच्या प्रत्येक शब्दात अमृतवाणी, सत्यता आणि बांधिलकी होती. कुठे कोणाला कसे ट्रीक करायचे ही सटीक कला आणि शैली त्यांना चांगलीच अवगत होती. नाना पाटेकरांनी आपल्या धारदार शैलीतून अनेक ज्वलंत प्रश्नांना व शेतकऱ्यांच्या प्रश्नांना सडेतोडपणे मिडिया समोर मांडून आणि सरकार व प्रशासनाशी संवाद साधून सोडविले सुध्दा आहेत. कारण त्यांच्या कार्यशैलीचा मुख्य उद्देश होता की,"बाप दाखव नाही तर श्राद्ध कर"अशा पध्दतीने अनेक प्रश्न सडेतोडपणे मांडून समाज जागृती व सरकारला जागे करण्याचे ते नेहमीच काम करायचे आणि त्यांचे ध्येय एकच होते ते म्हणजे खरेपणा यामुळेच ते चित्रपटसृष्टीत व सामाजिक क्षेत्रात एवढा मोठा शिखर गाठू शकेल.

– ९९२१६९०७७९

# विश्वविक्रमी सामन्यात विंडीजची भारतावर सरशी, मालिका बरोबरीवर!

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

रांची येथे झालेल्या दुसऱ्या टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यात वेस्ट इंडिजने भारताचा ६ गडी राखून पराभव केला. संघाने १८.३ षटकांत २५० धावांचे लक्ष्य पूर्ण केले. टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये भारताविरुद्धचा हा आतापर्यंतचा सर्वाधिक धावांचा पाठलाग आहे. भारताने पहिल्या डावात १३ षटकार मारले. यासह, हा संघ एका वर्षात ३०० षटकार मारणारा पहिला पूर्ण सदस्य संघ ठरला. सामन्यात एकूण ५०१ धावा झाल्या. टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यात ५०० पेक्षा जास्त धावा होण्याची ही केवळ दुसरी वेळ आहे.

**सामन्यातील प्रमुख विक्रम व क्षण, भारताने यावर्षी ३११ षटकार मारले**

भारताने २०२६ च्या टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ३११ षटकार मारले. एका वर्षात ३०० षटकार मारणारा हा पहिला पूर्ण सदस्य, म्हणजेच कसोटी खेळणारा संघ आहे. यापूर्वी, भारताने २०२२ मध्ये २८९ षटकार मारले होते.

**टी-२० मध्ये भारताविरुद्ध सर्वाधिक धावांचा पाठलाग**

वेस्ट इंडिजने रांचीमध्ये भारताविरुद्ध टी२० मधील सर्वाधिक धावांचा पाठलाग केला. यापूर्वी, २०२३ मध्ये ऑस्ट्रेलियाने भारताविरुद्ध २२३ धावांचे लक्ष्य यशस्वीपणे पूर्ण केले होते. एकूण टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये हा दुसरा सर्वात मोठा यशस्वी पाठलाग आहे. दक्षिण आफ्रिका पहिल्या स्थानावर आहे, ज्यांनी २०२३ मध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध २५९ धावांचे लक्ष्य पूर्ण केले होते.

**टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये दुसऱ्यांदा ५०० धावा**

रांचीमध्ये ५०१ धावा झाल्या. पुरुषांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात दोन्ही डावांमध्ये मिळून ५०० धावा होण्याची ही दुसरी वेळ आहे. दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडिज यांच्यातील सामना पहिल्या स्थानावर आहे. २००९ मध्ये सेंचुरियन येथे खेळल्या गेलेल्या या सामन्यात ५१७ धावा झाल्या.

**रांचीमध्ये ७९ चौकार**

रांची येथे भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील सामन्यात एकूण ७९ बाऊंड्रीज मारण्यात आल्या. यामध्ये ४६ चौकार आणि ३३ षटकारांचा समावेश होता. पुरुषांच्या टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यात सर्वाधिक चौकारांचा विक्रम दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडिजच्या नावावर आहे. २०२३ च्या या सामन्यात ८१ चौकार मारण्यात आले होते.

**शाई होप, वेस्ट इंडिजचा दुसरा सर्वात वेगवान टी-२० आंतरराष्ट्रीय शतकवीर**



होपने रांचीमध्ये ४५ चेंडूंमध्ये आपले शतक पूर्ण केले, ज्यामुळे तो वेस्ट इंडिजसाठी दुसरा सर्वात वेगवान टी२० आंतरराष्ट्रीय शतकवीर ठरला. जॉन्सन चार्ल्स ३९ चेंडूंसह पहिल्या स्थानावर आहे.

**टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये दोन शतके झळकावणारा होप वेस्ट इंडिजचा तिसरा फलंदाज ठरला**

होपने टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये आपले दुसरे शतक झळकावले. तो ख्रिस गेल आणि एव्हिन लुईस यांच्यानंतर वेस्ट इंडिजसाठी सर्वाधिक टी२० आंतरराष्ट्रीय शतके करणारा तिसरा फलंदाज ठरला आहे.

**होपने १५व्यांदा टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ५०+ धावा केल्या**

होपने १५व्यांदा टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ५० किंवा त्याहून अधिक धावा केल्या आहेत. या विक्रमात तो एविन लुईससोबत दुसऱ्या स्थानावर आहे. ख्रिस गेल १६ वेळा पन्नासपेक्षा जास्त धावा करून पहिल्या स्थानावर आहे.

**पूरनने सॅमसनचा ६ धावांवर असताना झेल सोडला**

तिसऱ्या षटकात ६ धावांवर फलंदाजी करत असलेल्या संजू सॅमसनचा झेल सुटला. त्याने अकील हुसेनच्या डावातील दुसऱ्या चेंडूवर फटका मारला. चेंडू कव्हरला उभ्या असलेल्या निकोलस पूरनच्या डावीकडे गेला. पूरनने दोन्ही हातांनी चेंडू पकडण्याचा प्रयत्न केला, पण चेंडू त्याच्या हातात टिकला नाही. त्याने दोनदा प्रयत्न केला, पण चेंडू त्याच्या हातातून निसटला. पूरनने झेल सोडल्यानंतर, सॅमसनने पुढे ८२ धावा केल्या. रोमॅरिओ शेफर्ड षटक पूर्ण न करताच मैदान सोडून गेला. १७ व्या षटकादरम्यान, रोमॅरिओ शेफर्डला अस्वस्थ वाटू लागले आणि तो मैदान सोडून गेला. तथापि, त्याच्या अस्वस्थतेचे कारण स्पष्ट झाले नाही. त्यानंतर रोव्हमन पॉवेलने षटक पूर्ण केले, तर कीमो पॉल बदली क्षेत्ररक्षक म्हणून आला. तथापि, शेफर्ड दुसऱ्या डावात फलंदाजीसाठी परत आला. त्याने १३ चेंडूंमध्ये नाबाद ३४ धावा करून संघाला विजय मिळवून दिला. रोमॅरिओने ३.४ षटकांत एकही बळी न घेता ४७ धावा दिल्या.

**तिलकने १९व्या षटकात सलग तीन षटकार मारले**

तिलक वर्माने डावाच्या शेवटच्या षटकात शमर स्प्रिंगरच्या गोलंदाजीवर सलग तीन षटकार मारले. त्याने पहिल्या चेंडूवर लाँग-ऑफच्या दिशेने षटकार मारला, त्यानंतर दुसऱ्या चेंडूवरही त्याच दिशेने षटकार मारला आणि तिसऱ्या चेंडूवर पुल शॉट मारून डीप मिडविकेटच्या दिशेने षटकार ठोकला. तिलकने १८ चेंडूंमध्ये नाबाद ४४ धावा केल्या.

**मयंक यादवने सलग दोन चेंडूंवर बळी घेतले**

मयंक यादवने डावाच्या अगदी पहिल्याच षटकात सलग दोन चेंडूंवर दोन बळी घेतले. षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर त्याने कामिल पूरनला एका आखूड चेंडूवर रवी बिश्नोईकरवी झेलबाद केले. मयंकने पुढचा चेंडू ताशी १४४ किमी वेगाने टाकला आणि शिमरॉन हेटमायरला त्रिफळाचीत केले.

रदरफोर्ड ३८ धावांवर असताना त्याचा जीव वाचला, त्यानंतर त्याने ८४ धावा केल्या. दुसऱ्या डावात, १० व्या षटकात मयंक यादवने रदरफोर्डचा जीव सोडला. कुलदीप यादवने षटकाच्या शेवटच्या चेंडूवर एक स्लोअर डिलिव्हरी टाकली, जी शेर्फेन रदरफोर्डने शॉर्ट फाइन लेगच्या दिशेने मारली. तिथे उभ्या असलेल्या मयंक यादवला चेंडू पकडण्याची संधी होती. तो चेंडू पकडण्याच्या प्रयत्नात गुडघ्यावर बसला, पण अयशस्वी ठरला. त्यावेळी रदरफोर्ड ३८ धावांवर फलंदाजी करत होता.

– ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# संभ्रम न बाळगता कार्यकर्त्यांने पक्षकार्य करावे !

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत कार्यकर्त्यांनी कुठलाही संभ्रम न बाळगता भाजपच्या अधिकृत उमेदवाराच्या विजयासाठी कार्य करावे, असे आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

महाल येथील गडकरी वाडा येथे नागपूर पदवीधर मतदारसंघ निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर माजी नगरसेवक व पदाधिकाऱ्यांच्या संवादात्मक बैठकीत ते बोलत होते. यावेळी भाजपा शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी, आमदार प्रवीण दटके, प्रा. गिरीश देशमुख, माजी महापौर अर्चना डेहनकर, रमण



सेनाड, नगरसेवक नरेंद्र बोरकर आदी उपस्थित होते.

पक्षाच्या विचारधारेला धरून निःस्वार्थपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची संख्या भाजपामध्ये फार मोठी आहे. राजकीय जीवनात काहींना महत्त्वाच्या पदांवर काम करण्याची संधी मिळते, तर काहींना मिळत नाही. त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्याने समाधानी वृत्तीने पक्षकार्य केले पाहिजे, असेही ते म्हणाले.

नागपूर पदवीधर मतदारसंघ निवडणुकीत कुठलाही संभ्रम न बाळगता पक्षाच्या उमेदवारासाठी काम करावे, असे आवाहन त्यांनी केले. प्रत्येक कार्यकर्ता पक्षासाठी मुख्य आधार असतो. त्यामुळे कार्यकर्त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी येत्या दिवाळीमध्ये निःशुल्क आरोग्य शिबिराचे आयोजन केले जाणार आहे. शिबिरात आरोग्याची तपासणी करून घ्यावी, असे आवाहनही नितीन गडकरी यांनी केले.

## अवैध रेती वाहतुक करणारा ट्रॅक्टर तुमसर पोलिसांच्या जाळ्यात

### ट्रॅक्टर चालक व मालकावर कारवाई एकुण सहा लाख छप्पन्न हजार रुपयेचा माल जप्त



**दै. सिंहवाणी वृत्त, तुमसर**

तुमसर पोलीस स्टेशन अंतर्गत येरली परिसरात दिनांक ९ आँक्टोंबर रोजी ट्रॅक्टरद्वारे अवैधरित्या रेतीची वाहतुक होत असल्याबाबत गोपणीय माहीती मिळाली असता तुमसर पोलिसांनी अवैध रेती वाहतुक करणारा ट्रॅक्टर पकडून चालक व मालकावर कारवाई केली. सविस्तर वृत्त असे की, मौजा येरली ते मोहगाव रोड येथे येथे एक निळ्या रंगाचा स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एमएच ३६ एएल ९१५९ व निळ्या रंगाची ट्राली मध्ये चालक नामे विक्रांत अजय घरडे वय २५ वर्ष रा. येरली ता. तुमसर जि. भंडारा हा त्याचे ट्रॅक्टर मध्ये अवैद्यरीत्या रेती भरुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने त्यास रॉयल्टी बाबत विचारणा केली असता रेती वाहतुकीचा परवाना सादर न केल्याने सदर आरोपी हा त्याचे ट्रॅक्टर मध्ये अवैधरित्या रेती भरुन रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने त्याचे ताब्यातून १ ब्रास रेती कींमती ६००० रू. व निळ्या रंगाचा स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर व निळ्या रंगाची ट्राली किंमती ६,५०,.००० असा एकुण ६,५६,००० रू. चा माल मिळुन आल्याने सदर आरोपी ट्रॅक्टर चालक तसेच ट्रॅक्टरचा मालक नामे छोटु फकीर पटले वय ४० वर्ष रा. येरली याचेवर फिर्यादी पो. शी. तिलक चौधरी यांचे लेखी रिपोर्टवरुन गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक नरूल हसन, अपर पोलीस अधिक्षक निलेश मोरे, उपविभागीय पोलीस अधिकारी महेश पाटील यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक सुभाष बारसे, (ठाणेदार), पोलीस निरीक्षक बाळासाहेब आघाव, पो. शी. तिलक चौधरी, पो. शी. राजु गिरेपुंजे, पो. शी. अजय बावणे यांनी केली असुन सदर गुन्ह्याचा तपास सपोनी किशोर घोडेस्वार पो. स्टे. तुमसर हे करीत आहेत.

## कारच्या धडकेत गोरक्षक अनिल गोरे ठार

**बोरी :** जिंतूर तालुक्यातील बोरी येथील गोरक्षक तथा शिव प्रतिष्ठान हिंदुस्थानचे धारकरी अनिल अजयराव गोरे (वय २७) दि. ९ ऑक्टोबर रोजी रात्री ८.३० वाजण्याच्या सुमारास परभणीस जात असताना त्यांच्या दुचाकीला परभणीहून जिंतूरकडे जाणा-या कारने धडक दिली. या अपघातात गंभीर दुखापत झाल्याने गोरे यांचा मृत्यू झाला.

शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे धारकरी आणि गोरक्षक म्हणून परिचित असलेल्या गोरे यांच्या निधनाची बातमी समजताच बोरी आणि परिसरात शोककळा पसरली असून अनेकांनी हळहळ व्यक्त केली.

## जि .प .शीतलवाडी येथील विद्यार्थ्यांची विभागीय पाणी तपासणी प्रयोगशाळेला भेट

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक :** जि.प.शीतलवाडी येथील विद्यार्थ्यांची विभागीय पाणी तपासणी प्रयोगशाळेला भेट देण्यात आली. जल हेच जीवन होय त्याबाबत सतर्कता राहावी म्हणून चिमुकल्या विद्यार्थ्यांना याबाबतचे मार्गदर्शन लाभावे असा उदात्त हेतू यामागे होता. मुख्याध्यापिका जया राठोड व सह शिक्षिका सरिता किंगर सोबत चिमुकल्यांची टीम प्रयोगशाळा परीक्षणासाठी पोहोचली.विभागीय पाणी



तपासणी प्रयोगशाळांचे मुख्य कार्य मानवी आरोग्यासाठी, सिंचनासाठी आणि उद्योगांसाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याची गुणवत्ता तपासणे आणि ते सुरक्षित राखणे हे आहे.या प्रयोगशाळा प्रामुख्याने भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणे मार्फत कार्यरत असतात. पाण्याच्या विविध चाचण्या १२ मानकांद्वारे तपासल्या जातात.

भौतिक आणि रासायनिक तपासणी द्वारे पाण्याचा गढूळपणा, विरघळलेले एकूण क्षार, कडकपणा, नायट्रेट, फ्लोराईड, लोह, क्लोराईड आणि सल्फेट यांचे प्रमाण तपासले जातात तसेच जैविक तपासणीमध्ये पाण्यात मानवी आरोग्यास घातक असणारे जीवाणू आहेत का, याची तपासणी केली जाते. प्रदूषित व विषारी घटक तपासणी मध्ये सांडपाणी किंवा औद्योगिक प्रक्रियेमुळे पाण्यात मिसळलेली कीटकनाशके आणि जड धातू यांची तपासणी केली जाते अशी माहिती रसायणी तज्ज्ञ विश्वास जाधव यांनी विद्यार्थ्यांना दिली. विध्यार्थ्यांना त्यांच्या सोप्या भाषेत मुख्याध्यापिका जया राठोड यांनी महत्व पटवून सांगितले. आणि चिमुकल्या विद्यार्थ्यांनी मनात उद्भवणारे विविध प्रश्न विचारले आणि रसायणी तज्ज्ञ विश्वास जाधव यांच्याकडून त्यांच्या शंकाचे समाधान करण्यात आले.या प्रसंगी मदतनीस अरविंद कटरे, गट समन्वयक राजीव मडामे, आणि समूह समन्वयक महेंद्र बुरले उपस्थित होते.

## स्थानीय लोकाधिकार सेना महासंघाचा प्रथम वर्धापनदिन मुंबईत उत्साहात साजरा

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह शिवसेनेच्या ज्येष्ठ नेत्यांची उपस्थिती, राजा रामद्वार यांना मान्यवरांसोबत व्यासपीठावर स्थान

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



स्थानीय लोकाधिकार सेना महासंघाचा प्रथम वर्धापनदिन सोहळा शुक्रवार, ९ ऑक्टोबर रोजी मुंबईतील बिरला मातोश्री सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्याला शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, शिवसेना नेते व माजी खासदार तसेच महासंघाचे अध्यक्ष गजानन कीर्तिकर (भाऊ), राज्याचे रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरतशेठ गोगावले, शिवसेनेचे सरचिटणीस व माजी खासदार राहुल शेवाळे, माजी खासदार आनंदराव अडसूळ, शिवसेना सचिव संजय मोरे, स्थानीय लोकाधिकार सेना महासंघाचे सरचिटणीस अरुण मोरे यांच्यासह विविध पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

या वर्धापनदिन सोहळ्याला नागपूर व वर्धा जिल्ह्यातील स्थानीय लोकाधिकार सेनेचे अध्यक्ष राजा रामद्वार उपस्थित होते. यावेळी राज्यातील प्रमुख राजकीय नेते आणि महासंघाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांसोबत व्यासपीठावर बसण्याची संधी मिळाल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. महासंघाचे अध्यक्ष गजानन कीर्तिकर तसेच महासंघाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे त्यांनी मनःपूर्वक आभार मानले. स्थानीय लोकाधिकार सेना महासंघाच्या पहिल्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमातून संघटनेच्या वर्षभरातील वाटचालीचा आढावा घेण्यासोबतच आगामी काळातील संघटनात्मक कार्याला दिशा देण्याची संधी मिळाली. विविध जिल्ह्यांतील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला संघटनात्मक महत्त्व प्राप्त झाले.

स्थानिक नागरिकांचे प्रश्न, स्थानिकांना रोजगाराच्या संधी आणि स्थानिकांच्या हक्कांसाठी संघटितपणे कार्य करण्याच्या दृष्टीने अशा कार्यक्रमांना महत्त्व असल्याचे यावेळी अधोरेखित झाले. या कार्यक्रमाला स्थानीय लोकाधिकार सेना नागपूर-वर्धाचे उपाध्यक्ष मोरेश्वर पंचबुधे आणि अशोक जवंजाळ यांचीही उपस्थिती होती. मुंबई येथे झालेल्या या सोहळ्यात वरिष्ठ नेत्यांसोबत सहभागी होण्याची संधी मिळाल्याने नागपूर- वर्धा विभागातील पदाधिकाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण होते. महासंघाचे अध्यक्ष गजानन (भाऊ) कीर्तिकर आणि सर्व पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या सन्मानाबद्दल राजा रामद्वार यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

## योग्य दाबाने व अखंडित वीजपुरवठ्यासाठी कृषीपंपाला कॅपेसिटर बसवा, महावितरणचे शेतकऱ्यांना आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



यंदा पावसाने दडी मारल्यामुळे शेतीसाठी पाणी उपशाची गरज निर्माण झाली असून, संपूर्ण नागपूर जिल्ह्यासह विदर्भात कृषीपंपांचा वापर प्रचंड प्रमाणात वाढला आहे. वीज पुरवठा सुरू होताच शेतातील कृषीपंप आपोआप सुरू व्हावेत यासाठी बहुतांश शेतकऱ्यांनी पंपांना ऑटोस्विच बसवले आहेत. मात्र, या ऑटोस्विचमुळे एकाच वेळी रोहित्रावरील सर्व कृषीपंप चालू होऊन वीज यंत्रणेवर अचानक मोठा भार पडत आहे. परिणामी, रोहित्र जळणे, वीज वाहिन्यांच्या तारा तुटणे, वारंवार ट्रिपिंग होणे आणि ऐन मोक्याच्या वेळी पिकांना पाणी देण्याच्या काळातच वीज खंडित होणे अशा गंभीर समस्या निर्माण होत आहेत. या तांत्रिक अडचणींवर मात करण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या कृषीपंपाला योग्य क्षमतेचा कॅपेसिटर बसवून वापरात असलेले ऑटोस्विच तात्काळ काढून टाकावेत, असे आवाहन महावितरणने केले आहे.

शेतामध्ये प्रामुख्याने थ्री-फेज इंडक्शन मोटरचा वापर केला जातो. या मोटारी सुरू होताना आणि चालताना वीज वाहिन्यांवरून आवश्यकतेपेक्षा सुमारे ३० टक्के अतिरिक्त इंडक्टिव्ह करंट म्हणजेच रिएक्टिव्ह पॉवर खेचतात. यामुळे विद्युत वाहिनीवर प्रचंड ताण येऊन मोटारी जळणे, ट्रान्सफॉर्मर ओव्हरलोड होऊन जळणे, लाईनमध्ये वारंवार फॉल्ट होणे आणि एलटी लाईन ट्रिप होण्याचे प्रकार घडतात. महावितरणच्या दृष्टीने ही वीज यंत्रणेवरील अतिरिक्त ताणाची आणि वारंवार होणाऱ्या तांत्रिक बिघाडांची सर्वात मोठी समस्या ठरत आहे.

कॅपेसिटर हे एक साधे परंतु अत्यंत प्रभावी उपकरण आहे. ते कृषीपंपाला लागणारी रिएक्टिव्ह पॉवर थेट स्थानिक पातळीवरच पुरवते. यामुळे मुख्य वीज वाहिनीवरून वाहणारा अतिरिक्त ३० टक्के वीज प्रवाह लगेच कमी होतो. परिणामी, महावितरणला सर्व ग्राहकांना योग्य व उच्च दाबाने अखंडित वीज पुरवठा देणे शक्य होते. तसेच ट्रान्सफॉर्मर जळणे, वीज तारा तुटणे आणि मोटार खाक होणे यांसारख्या मोठ्या नुकसानीवर प्रभावीपणे नियंत्रण मिळवता येते.

बाजारात एल अँड टी, कॅपको, हॅवेल्स यांसारख्या विविध नामांकित कंपन्यांचे दर्जेदार कॅपेसिटर सहज उपलब्ध आहेत. कृषीपंपाच्या क्षमतेनुसार ३ एचपी मोटारीसाठी १ केव्हीएआर, ५ एचपी मोटारीसाठी २ केव्हीएआर तर ७.५ एचपी मोटारीसाठी ३ केव्हीएआर क्षमतेचा कॅपेसिटर पुरेसा ठरतो. अवघ्या ३०० ते ५०० रुपयांच्या नाममात्र खर्चात मिळणाऱ्या या लहानशा उपकरणा मुळे शेतकऱ्यांची हजारो रुपयांची मोटार जळण्यापासून वाचते. शिवाय, ऐन पिकांच्या वाढीच्या टप्प्यात वीज पुरवठा खंडित न होता वेळेवर पाणी मिळाल्याने शेतातील उत्पादनात होणारी मोठी घट देखील सहज टाळता येते.

कॅपेसिटरचा पूर्ण फायदा मिळण्यासाठी त्याची योग्य ठिकाणी जोडणी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कॅपेसिटर लावताना तो ईनकमींग म्हणजेच मुख्य वीज पुरवठा साईडला न लावता नेहमी स्टार्टर आणि मोटरला जोडलेल्या वायरच्या दरम्यान लावावा. अशा प्रकारे जोडणी केल्यामुळे जेव्हा जेव्हा मोटार सुरू होईल, केवळ त्याच वेळी कॅपेसिटरचे कार्य सुरू राहील आणि मोटार बंद असताना तो अनावश्यकपणे चालू राहणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी महावितरणच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन त्वरित कॅपेसिटर बसवावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, शुक्रवारी (दि. ९ ऑक्टोबर) नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी खापरखेडा उपविभागाअंतर्गत असलेल्या घोगली गावातील शेतकरी राजू उकुंदराव राऊत यांच्या बांधावर प्रत्यक्ष भेट दिली.

या वेळी त्यांनी राजू राऊत यांना कॅपेसिटरचे तांत्रिक महत्त्व समजावून सांगितले, तसेच महावितरणतर्फे त्यांना प्रातिनिधिक स्वरूपात एक कॅपेसिटर भेट देऊन त्याचा तात्काळ वापर सुरू करण्याचे सुचवले. महावितरणच्या या उपक्रमाचा आदर्श घेत परिसरातील सर्व शेतकऱ्यांनी ऑटोस्विच काढून कॅपेसिटर बसवावेत, असे आवाहन या प्रसंगी करण्यात आले. यावेळी उपकार्यकारी अभियंता मंगेश कहाळे आणि त्यांचे सहकारी उपस्थित होते.

थोडक्यात

## भिवापूर महाविद्यालयात पदव्युत्तर विद्यार्थ्यांचे स्वागत

### विद्यार्थी परिषदेची स्थापना, सांस्कृतिक कार्यक्रमांची रंगत



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

भिवापूर महाविद्यालयात एम.एस्सी., एम.कॉम. आणि एम.ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित इंडक्शन व फ्रेशर्स स्वागत समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी एम.एस्सी.च्या विद्यार्थ्यांच्या विद्यार्थी परिषदेची स्थापना करण्यात आली. प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सुनील शिंदे होते.

प्रमुख उपस्थितीत प्रा. डॉ. मंगेश कडू, प्रा. डॉ. अनिता महावादीवार आणि प्रा. डॉ. अश्विनी ढोंगे उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी समूह नृत्य, समूहगीत, एकल गीत आणि सामूहिक प्रार्थना सादर करून कार्यक्रमात रंगत आणली. यावेळी नवागत विद्यार्थ्यांचे भेटवस्तू देऊन स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांनी शिस्त, आत्मविश्वास, वेळेचे नियोजन आणि नैतिक मूल्ये जोपासत शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन अध्यक्षीय भाषणात डॉ. सुनील शिंदे यांनी केले. प्रा. धम्मदीप सहारे यांनी प्रास्ताविक केले. आकांक्षा वरठी हिने सूत्रसंचालन, तर प्रितेश उके याने आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाला प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## नवेगावच्या उसरपंचाला घरकर थकविणे भोवले

### जिल्हाधिकाऱ्यांनी ठरविले अपात्र

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**



ग्रामपंचायतीची घरपट्टी ९० दिवसांत न भरल्याने नवेगाव (देशमुख) येथील उपसरपंच उमेश आनंदराव डडमल यांना ग्रामपंचायत सदस्यपदावरून अपात्र ठरविण्यात आले आहे. अप्पर जिल्हाधिकारी प्रवीण महिरे यांनी २३ सप्टेंबर २०२६ रोजी हा आदेश दिला. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील कलम १४(१)(ह) व १६ अन्वये ही कारवाई करण्यात आली.

माजी सरपंच युवराज पाल यांनी डडमल यांच्याविरुद्ध अपात्रतेचा अर्ज दाखल केला होता. ग्रामपंचायतीने २४ जून २०२४ रोजी ७ हजार ५५६ रुपयांचे घरपट्टी मागणी बिल दिले होते. मात्र, डडमल यांनी २९ नोव्हेंबर २०२४ रोजी एक हजार रुपये आणि २७ मार्च २०२५ रोजी ५ हजार ८०६ रुपये भरले. त्यामुळे विहित मुदतीत कराचा भरणा न झाल्याचे स्पष्ट झाले.

**भाडेकरू असल्याचा दावाही फेटाळला**

वडिलांच्या नावावरील घरात राहत नसून अन्यत्र भाड्याने राहत असल्याचा दावा उपसरपंच डडमल यांनी केला होता. मात्र, सादर केलेला भाडेकरार अनधिकृत असल्याचे निरीक्षण अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी नोंदविले. त्यानंतर वारंवार संधी देऊनही डडमल यांनी लेखी उत्तर सादर न केल्याने अखेर युवराज पाल यांचा अर्ज मंजूर करुन डडमल यांना अपात्र ठरविण्यात आले. या निर्णयामुळे नवेगावच्या स्थानिक राजकारणात खळबळ उडाली आहे.

## पोलिसांकडून सात गोवंशांची सुटका

### झायलो कारसह ४.९० लाखांचा मुद्देमाल जप्त, आरोपी अद्याप फरार



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

संशयास्पद झायलो कारचा पाठलाग करून भिवापूर पोलिसांनी सात गोवंशांची सुटका केली. या कारवाईत गोवंशांसह एकूण ४ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. मात्र, कार सोडून पसार झालेला आरोपी अद्याप पोलिसांच्या हाती लागलेला नाही. ९ ऑक्टोबर रोजी पोलिसांची गस्त व नाकाबंदी सुरू असताना पवनीकडून उमरेडकडे जाणारी एमएच १२ एफके २४८२ क्रमांकाची झायलो कार भरधाव जाताना दिसली. पोलिसांना संशय आल्याने त्यांनी कारचा पाठलाग केला. यावेळी चालकाने पांजेपार शिवारातील रस्त्यालगतच्या खोलगट शेतात कार सोडली आणि अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पळ काढला.

पोलिसांनी पंचांसमक्ष कारची तपासणी केली असता त्यामध्ये सात गोवंश निर्दयतेने बांधून ठेवल्याचे आढळले. पोलिसांनी तातडीने गोवंशांची सुटका करून त्यांच्यावर वैद्यकीय उपचार केले आणि त्यांना नांदा येथील गोशाळेत दाखल केले. या प्रकरणी भिवापूर पोलिस ठाण्यात विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील आरोपी अद्याप सापडलेला नसून त्याचा शोध सुरू आहे. गुन्ह्याचा पुढील तपास उपनिरीक्षक सचिन उरकुडे करीत आहेत. उपविभागीय पोलिस अधिकारी उमरेड विभागाचे मयंक माधव यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार सहायक पोलिस निरीक्षक अजितसिंग देवरे, उपनिरीक्षक सचिन उरकुडे, उपनिरीक्षक विजय माळी आणि पोलिस कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली.

थोडक्यात

## नरेंद्र सोनारकर यांच्या 'कोर्टाच्या आवारात' काव्य संग्रहाला पुरस्कार जाहीर

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर-धनंजय पांढरे**

येथील कवी आणि पत्रकार नरेंद्र सोनारकर यांच्या प्रकाशनाधीन कोर्टाच्या आवारात या दीर्घ काव्यसंग्रहाला कवी नारायण सुर्वे स्मृती लक्षवेधी कविता पुरस्कार जाहीर झाला आहे. समाज




साहित्य प्रतिष्ठान, सिंधुदुर्ग यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय दीर्घ काव्य स्पर्धेत सोनारकर यांच्या कवितेची निवड करण्यात आली. महाराष्ट्रासह बेळगाव आणि गोवा येथील कवींचा सहभाग असलेल्या या स्पर्धेत त्यांच्या कवितेने लक्षवेधी ठसा उमटविल्याने बल्लारपूरच्या साहित्य क्षेत्रात आनंद व्यक्त होत आहे. महान वास्तववादी कवी नारायण सुर्वे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त समाज साहित्य प्रतिष्ठान, सिंधुदुर्ग यांच्या वतीने या दीर्घ काव्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेसाठी राज्यभरातील कवींनी आपल्या दीर्घ कविता पाठविल्या होत्या. त्यातून निवडलेल्या दहा कवींच्या कवितांना नारायण सुर्वे स्मृती लक्षवेधी कविता पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. या निवडक कवींमध्ये नरेंद्र सोनारकर यांचा समावेश आहे. या स्पर्धेचे परीक्षण नामवंत साहित्य समीक्षक आणि शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे तसेच ज्येष्ठ मराठी कवी व समीक्षक एकनाथ पाटील यांनी केले. त्यांच्या परीक्षणातून सोनारकर यांच्या कोर्टाच्या आवारात या दीर्घ कवितेची पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट दीर्घ कवितेचा पुरस्कार ठाणे येथील कवी अविनाश गायकवाड यांच्या उडत्या पाखरांची पिसं या कवितेला जाहीर झाला आहे. या पुरस्काराचे स्वरूप दहा हजार रुपये, स्मृतिचिन्ह, शाल आणि ग्रंथ असे आहे. याशिवाय विशेष लक्षवेधी पुरस्कारासाठी निवड झालेल्या कवींमध्ये नरेंद्र सोनारकर यांच्यासह हर्षदा सुंठणकर (बेळगाव), स्वप्निल सुनील चव्हाण (पुणे), खाजा बशीर बागवान (सोलापूर), राजेंद्र मुंढे (वर्धा), अश्विनी दीक्षित (बारामती), बादल मुरारी (राजगुरुनगर), दिशा खातू (मुंबई), विद्या देशमुख (अमरावती) आणि गणेश भाकरे (नागपूर) यांचा समावेश आहे.या पुरस्कारांचे वितरण डिसेंबर महिन्यात मालवण येथे आयोजित सहाव्या समाज साहित्य संमेलनात करण्यात येणार आहे. नरेंद्र सोनारकर यांचा कोर्टाच्या आवारात हा दीर्घ काव्यसंग्रह लवकरच वाचकांच्या भेटीला येणार आहे. मात्र, प्रकाशनापूर्वीच या संग्रहातील कवितेला प्रतिष्ठेचा लक्षवेधी पुरस्कार जाहीर झाल्याने या काव्यसंग्रहाविषयी साहित्यप्रेमी, अभ्यासक आणि समीक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. राज्यस्तरीय स्पर्धेत निवडक दहा कवींमध्ये स्थान मिळविणे ही सोनारकर यांच्या साहित्यिक वाटचालीतील महत्त्वाची बाब मानली जात आहे. त्यांच्या या यशाबद्दल साहित्य क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## रामटेकमधील फिल्म सिटीची जागा डॉ. आंबेडकर शैक्षणिक व पर्यटन विकासासाठी द्या!

**अन्यथा आंदोलनाचा इशारा : नितीन पाटील, युथ वेल्फेअर असोसिएशनचा फिल्म सिटी हस्तांतरणाला जाहीर विरोध, न्यायालयीन लढाई लढण्याचाही निर्धार**




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

रामटेक तालुक्यातील मौजा नवरगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक व पर्यटन विकासासाठी प्रस्तावित असलेली जागा फिल्म सिटीसाठी हस्तांतरित करण्यात आल्याच्या निर्णयाविरोधात युथ वेल्फेअर असोसिएशन, नागपूरने आक्रमक भूमिका घेतली आहे. या जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने शैक्षणिक व पर्यटन विकासासाठी नियोजित प्रकल्प उभारण्यात यावा, अशी मागणी संघटनेने केली असून, फिल्म सिटीला देण्यात आलेल्या जागेच्या निर्णयाचा जाहीर निषेध करण्यात आला आहे. यासंदर्भात आज आयोजित पत्रकार परिषदेत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांकडून भूमिका स्पष्ट करण्यात येणार आहे.

रामटेक तालुक्यातील मौजा नवरगाव येथील सर्वे क्रमांक ७९/१ मधील एकूण ५२.३४ हेक्टर क्षेत्रापैकी २० हेक्टर जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक व पर्यटन विकासाच्या प्रस्तावित प्रकल्पासाठी राखीव ठेवण्याची मागणी करण्यात आली होती. यासाठी युथ वेल्फेअर असोसिएशन, नागपूरच्या वतीने संबंधित प्राधिकरणाकडे वेळोवेळी निवेदने देऊन पाठपुरावा करण्यात आला. तसेच संबंधित ग्रामपंचायत, वन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगररचना विभाग आणि अन्य संबंधित विभागांकडून ना-हरकत प्रमाणपत्रे मिळविण्यात आली होती. संघटनेच्या म्हणण्यानुसार, या जागेसाठी मागील अनेक वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा सुरू होता. मात्र, रामटेक परिसरातील राज्य शासनाच्या निर्णयानुसार संबंधित जागा फिल्म सिटीसाठी हस्तांतरित करण्यात आल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक व पर्यटन विकासाच्या प्रस्तावित प्रकल्पाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या जागेवर शैक्षणिक संकुल आणि विपश्यना केंद्र उभारण्याची संकल्पना होती. त्यामुळे या प्रकल्पासाठी अपेक्षित असलेली जागा दुसऱ्या प्रयोजनासाठी देण्यात आल्याने आंबेडकरी समाजाच्या विकासाच्या अपेक्षांना धक्का बसल्याची भावना संघटनेने व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर युथ वेल्फेअर असोसिएशनने फिल्म सिटीसाठी करण्यात आलेल्या जागेच्या हस्तांतरणाचा निषेध केला असून, संबंधित जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक व पर्यटन विकासासाठी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी केली आहे.

पत्रकार परिषदेला युथ वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष नितीन पाटील, माजी विरोधी पक्षनेते म.न.पा.धरम पाटील, प्रदीप सोमकुंवर, प्रमोद चिंचखेडे आणि शैलेश पाटील यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# चंद्रपूर-बल्लारशाह रेल्वे स्थानकांच्या पुनर्विकासाला गती द्या!

**आ. सुधीर मुनगंटीवार यांचे विभागीय रेल्वे प्रबंधकांना निर्देश, विभागीय रेल्वे प्रबंधक विनायक गर्ग यांच्यासोबत नागपुरात महत्वपूर्ण बैठक, ताडोबा एक्स्प्रेससह रेल्वे संबंधित विषयांवर चर्चा**

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर-धनंजय पांढरे**

चंद्रपूर आणि बल्लारशाह रेल्वे स्थानकांच्या पुनर्विकासाची कामे अधिक गतीने पूर्ण करून दोन्ही स्थानके अत्याधुनिक, आकर्षक आणि वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपात विकसित करावीत, तसेच प्रवाशांच्या सुविधांमध्ये भरीव वाढ करावी, अशा स्पष्ट सूचना आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मध्य रेल्वेच्या नागपूर विभागीय कार्यालयात विभागीय रेल्वे प्रबंधक विनायक गर्ग यांच्यासोबत झालेल्या बैठकीत दिल्या. ताडोबा एक्स्प्रेसचे नामकरण, रेल्वेगाड्यांच्या फेऱ्यांमध्ये वाढ, प्रलंबित रेल्वे प्रकल्प, भूसंपादन, पादचारी उड्डाणपूल आणि व्यापाऱ्यांचे प्रश्न अशा अनेक महत्त्वपूर्ण विषयांवर त्यांनी यावेळी सविस्तर चर्चा करून संबंधित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी पाठपुरावा केला.

आ. सुधीर मुनगंटीवार यांनी अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत चंद्रपूर आणि बल्लारशाह रेल्वे स्थानकांच्या पुनर्विकासाची कामे अधिक वेगाने पूर्ण करण्यावर विशेष भर दिला. दोन्ही स्थानकांचा विकास केवळ पायाभूत सुविधांपुरता मर्यादित न राहता, प्रवाशांना आधुनिक सुविधा देणारा आणि चंद्रपूर जिल्ह्याची स्वतंत्र ओळख अधोरेखित करणारा असावा, अशी भूमिका त्यांनी मांडली. या कामांच्या सद्यस्थितीचा आढावा घेऊन आवश्यक कार्यवाहीला गती देण्याच्या सूचना त्यांनी विभागीय रेल्वे प्रबंधक श्री. विनायक गर्ग यांना केल्या.

आ. सुधीर मुनगंटीवार यांनी बल्लारशाह-लोकमान्य टिळक टर्मिनस नवीन रेल्वेगाडीला ताडोबा एक्स्प्रेस हे नाव देण्याच्या प्रस्तावाला गती देण्याची सूचना केली. या रेल्वेगाडीच्या आकर्षक आणि वैशिष्ट्यपूर्ण डिझाइनला अंतिम स्वरूप देण्यासाठी जे. जे. स्कूल ऑफ आर्ट आणि ताडोबा प्रशासनातील अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी, असे त्यांनी सांगितले.




आ. सुधीर मुनगंटीवार यांनी बल्लारशाह रेल्वे स्थानकावरून विविध रेल्वेगाड्यांच्या फेऱ्या वाढविणे आणि पुण्यासाठी रेल्वेसेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने रेल्वे प्रशासनाचे लक्ष वेधले. अधिकाधिक रेल्वेगाड्यांचे प्रस्ताव मुख्यालयाकडे पाठविण्यात आले असून, त्यावर लवकरच सकारात्मक कार्यवाही होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. वर्धा-सेवाग्राम-बल्लारशाह तिसऱ्या रेल्वेमार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतर गाड्यांची वारंवारता वाढविण्यास अधिक वाव उपलब्ध होईल, याकडेही लक्ष वेधण्यात आले.

आ. सुधीर मुनगंटीवार यांनी रेल्वे स्थानकावरील पादचारी उड्डाणपुलाचे काम तसेच बल्लारपूर येथील गोल पुलिया रेल्वे भुयारी मार्गाची सुधारणा तातडीने करण्याच्या सूचना दिल्या. गोल पुलिया परिसरात सिमेंट काँक्रीटचा रस्ता किंवा उच्च दर्जाचे डांबरीकरण करून नागरिकांची ये-जा अधिक सुरक्षित आणि सुलभ करावी, अशी मागणी त्यांनी विभागीय रेल्वे प्रबंधक विनायक गर्ग यांच्याकडे केली.

आ. सुधीर मुनगंटीवार यांनी बल्लारपूर शहरातील मध्य रेल्वेच्या जमिनीवरील शॉपिंग कॉम्प्लेक्समध्ये व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांचा प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतला. या प्रकरणात विभागीय रेल्वे प्रबंधक विनायक गर्ग स्वतः प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेण्यासंदर्भात आश्वासन बैठकीत आ. सुधीर मुनगंटीवार यांना दिले.

आ. सुधीर मुनगंटीवार यांनी बाबूपेठ-सास्ती परिसरातील प्रस्तावित रेल्वेमागार्साठी होणाऱ्या भूसंपादनामुळे बाधित शेतकऱ्यांच्या आक्षेपांचे निराकरण करून त्यांना योग्य मोबदला व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. तसेच वर्धा-सेवाग्राम-बल्लारशाह तिसऱ्या रेल्वेमार्गिका व डम्पिंग यार्ड प्रकल्पासाठी मौजा बल्लारपूर येथील भूसंपादनाची सद्यस्थिती जाणून घेण्यावरही त्यांनी भर दिला.आ. सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर शहरातील मध्य रेल्वेच्या जमिनीवरील अतिक्रमणांच्या प्रश्नावर मानवी दृष्टिकोनातून निर्णय घेण्याची भूमिका मांडली. संबंधित अतिक्रमणधारकांसाठी पर्यायी निवासाची व्यवस्था उपलब्ध होईपर्यंत अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही स्थगित ठेवण्याची मागणी त्यांनी केली. यासोबतच भाग्यनगर एक्स्प्रेसचा कागजनगर येथून बल्लारशाह-चंद्रपूरपर्यंत विस्तार करण्याच्या प्रस्तावावर तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

आ. सुधीर मुनगंटीवार यांनी या बैठकीत प्रवाशांच्या सुविधा, रेल्वे पायाभूत सुविधांचा विकास, शेतकऱ्यांचे हित आणि व्यापाऱ्यांच्या प्रश्नांची सोडवणूक या सर्व बाबींवर एकत्रितपणे भर देत संबंधित विषयांवरील कार्यवाहीचा पाठपुरावा केला. चंद्रपूर जिल्ह्यातील रेल्वेसेवा अधिक सक्षम करण्यासाठी आणि प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी विभागीय रेल्वे प्रबंधक श्री. विनायक गर्ग यांनी संबंधित विषयांवर आवश्यक कार्यवाहीला गती द्यावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.यावेळी याबैठकीला माजी आमदार संजीव रेड्डी बोदकुरवार, अजय दुबे सदस्य झेडआरयूसीसी मध्य रेल्वे, मुंबई,विभागीय रेल्वे प्रबंधक विनायक गर्ग आणि रेल्वे विभागाशी संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.

# नीव बालिकांची भरारी, काटोलमध्ये १९० मुलींची पाच किलोमीटर धाव पूर्ण

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

ग्रामीण भागातील मुलींमध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांना शारीरिक, मानसिक व भावनिकदृष्ट्या सक्षम बनविण्याच्या उद्देशाने 'हमारी लाडो फाउंडेशन'च्या 'नीव : मुली धावतील सर्वांत पुढे' या उपक्रमांतर्गत काटोल येथील जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये पाच किलोमीटर धावण्याच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात परिसरातील सहा ग्रामीण शाळांमधील १९० विद्यार्थिनींनी उत्साहाने सहभाग नोंदवून पाच किलोमीटर धाव पूर्ण केली.

या धावण्याच्या उपक्रमाला गटशिक्षणाधिकारी विशाल पांढरे आणि विस्तार अधिकारी जावेद इक्बाल यांनी हिरवी झेंडी दाखवून सुरुवात केली. यावेळी त्यांनी सहभागी विद्यार्थिनींचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहन दिले.




'नीव : मुली धावतील सर्वांत पुढे' हा ग्रामीण भारतातील मुलींमध्ये आत्मविश्वास, आनंद आणि स्वतःचे विचार व्यक्त करण्याची क्षमता विकसित करण्यासाठी राबविण्यात येणारा संशोधनाधारित, अनुभवात्मक उपक्रम आहे. सन २०२१ मध्ये राजस्थानमधील लिखमेवाला गावात अवघ्या २६ मुलींपासून सुरू झालेल्या या उपक्रमाचा विस्तार आज देशभर झाला आहे. सध्या देशातील नऊ राज्यांमधील १० हजार मुली आणि महिला प्रशिक्षक या राष्ट्रीय अभियानाशी जोडल्या गेल्या आहेत. याच अभियानाचा भाग म्हणून काटोल परिसरातील विद्यार्थिनींनी पाच किलोमीटर धाव पूर्ण केली. फोर्थ पार्टनर एनर्जी लिमिटेड (एफपीईएल) यांच्या सहकार्याने हा उपक्रम जिल्ह्यात राबविण्यात येत आहे.

या उपक्रमांतर्गत सहावी आणि सातवीच्या विद्यार्थिनींसाठी वर्षातून दोन वेळा प्रत्येकी दहा आठवड्यांचे प्रशिक्षण सत्र आयोजित केले जाते. शाळेतील नियमित शिक्षणासोबतच विविध उपक्रम, व्यायाम आणि नियमित धावण्याच्या सरावातून मुलींच्या शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक आणि भावनिक विकासावर भर दिला जातो. त्यामुळे विद्यार्थिनींमध्ये खेळाविषयी आवड निर्माण होण्यासह आत्मविश्वास आणि शिस्त विकसित होण्यास मदत होते.

यासोबतच 'नीव शक्ती' कार्यक्रमांतर्गत विद्यार्थिनींना मासिक पाळीच्या काळातील आरोग्य व स्वच्छता, वैयक्तिक काळजी आणि स्वसंरक्षण याविषयी मार्गदर्शन व प्रशिक्षण दिले जाते. या माध्यमातून मुलींना शाळेत, घरी आणि समाजात अधिक सुरक्षितपणे व आत्मविश्वासाने वावरता यावे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

'हमारी लाडो फाउंडेशन'ने प्रशिक्षित केलेल्या स्थानिक महिला प्रशिक्षकांच्या माध्यमातून हा कार्यक्रम राबविला जातो. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी जिल्हा प्रशासन, शिक्षण विभाग आणि सहभागी शाळांचे सहकार्य लाभत आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल फाउंडेशनच्या वतीने राधिका सचदेवा यांनी सर्व सहकार्यकर्ते, शिक्षक आणि सहभागी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. तसेच विद्यार्थिनींच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## सावरगाव येथे भरदिवसा घरफोडी, २.८५ लाखांचा मुद्देमाल लंपास

**पारडसिंगा येथे कार्यक्रमाला गेले होते निकोसे कुटुंब, कुलूप तोडून दागिने व रोकड लंपास**

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यात घरफोडीच्या घटनांमध्ये वाढ झाली असून, मौजा सावरगाव (वार्ड क्र. ६) येथे एका बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी ३९ ग्रॅम सोन्याचे दागिने आणि ५० हजार रुपयांच्या नगदीसह एकूण २ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. ही घटना ३ ते ५ ऑक्टोबर दरम्यान घडली असून, याप्रकरणी नरखेड पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सावरगाव येथील रहिवासी तक्रारदार राजेन्द्र बापुरावजी निकोसे (५७) हे ३ ऑक्टोबर रोजी दुपारी ५ वाजताच्या सुमारास आपल्या घराला कुलूप लावून पत्नीसह मध्यप्रदेशातील पारडसिंगा येथे एका कौटुंबिक कार्यक्रमासाठी गेले होते. दरम्यान, ५ ऑक्टोबर रोजी सकाळी १०:३० वाजताच्या सुमारास निकोसे कुटुंब घरी परतले. यावेळी त्यांना घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप आणि कडी-कोंडा तुटलेल्या अवस्थेत आढळून आला.

घाबरलेल्या अवस्थेत त्यांनी आत जाऊन बेडरूममध्ये पाहिले असता, लोखंडी कपाटाचे कुलूप तोडून आतील सामान अस्ताव्यस्त पडले होते. कपाटातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम गायब असल्याचे लक्षात येताच त्यांना घरात चोरी झाल्याचे समजले. चोरट्यांनी कपाटातून १ लाख २७ हजार रुपये किमतीचा १५ ग्रॅमचा सोन्याचा गोफ, १५ हजार रुपयांची ५ ग्रॅमची सोन्याची अंगठी, ४५ हजार रुपयांचे १५ ग्रॅमचे सोन्याचे मंगळसूत्र, ४८ हजार रुपयांचे सोन्याचे कानसारे आणि ५० हजार रुपये रोख, असा एकूण २ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. या घटनेची माहिती मिळताच नरखेड पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला. तक्रारदार राजेन्द्र निकोसे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (इठर) २०२३ च्या कलम ३३१(३), ३३१(४) व ३०५(˙) अन्वये अज्ञात चोराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुरेखा रमेश बिडगर व ईतर पोलीस करीत आहे.

# पोलिसांच्या कार्यपद्धतीची विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ओळख, कायदा-सुव्यवस्थेचे धडे!

**श्री आर. एम. इंगोले हायस्कूलच्या विद्यार्थ्यांची जलालखेडा पोलीस ठाण्याला भेट, ठाणेदार विनोद जांभळे यांची घेतली मुलाखत**

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

पुस्तकी ज्ञानासोबतच प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण मिळावे, तसेच विद्यार्थ्यांमध्ये कायद्याविषयी जागरूकता, सामाजिक जबाबदारी आणि नागरिकत्वाची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने श्री आर. एम. इंगोले हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, भारसिंगी येथील विद्यार्थ्यांनी जलालखेडा पोलीस स्टेशनला भेट दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी ठाणेदार विनोद जांभळे यांची मुलाखत घेऊन पोलिसांच्या दैनंदिन कामकाजाची, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी केल्या



जाणाऱ्या उपाययोजनांची आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलिसांकडून बजावण्यात येणाऱ्या जबाबदारीची माहिती जाणून घेतली.

पोलीस प्रशासनाचे कामकाज नेमके कसे चालते, गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या जातात, नागरिकांच्या तक्रारींचे निवारण कसे केले जाते, याविषयी विद्यार्थ्यांनी उत्सुकतेने प्रश्न विचारले. ठाणेदार विनोद जांभळे यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना सविस्तर उत्तरे देत त्यांच्या शंकांचे निरसन केले. पोलिसांचे कार्य केवळ गुन्हेगारांवर कारवाई करण्यापुरते मर्यादित नसून समाजात शांतता राखणे, नागरिकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे आणि कायद्याचे पालन सुनिश्चित करणे, अशा विविध जबाबदाऱ्या पोलिसांना पार पाडाव्या लागतात, याची माहिती विद्यार्थ्यांना मिळाली.

सध्याच्या डिजिटल युगात वाढणाऱ्या सायबर गुन्ह्यांबाबतही विद्यार्थ्यांनी माहिती जाणून घेतली. मोबाईलवर येणारे अनोळखी फोन, संशयास्पद लिंक, ऑनलाइन आर्थिक फसवणूक, ओटीपी आणि बँक खात्याशी संबंधित गोपनीय माहिती याबाबत सतर्क राहण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. सोशल मीडियाचा वापर करताना खबरदारी घेणे आणि कोणत्याही आमिषाला बळी न पडणे आवश्यक असल्याचेही मार्गदर्शन करण्यात आले.

वाहतुकीचे नियम पाळणे, रस्त्यावर सुरक्षिततेची काळजी घेणे, सार्वजनिक ठिकाणी शिस्त राखणे आणि कायद्याचे उल्लंघन टाळणे, याविषयीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येक नागरिकाने कायद्याचा आदर करून समाजाप्रती असलेली आपली जबाबदारी ओळखली पाहिजे, असे या संवादातून अधोरेखित झाले. पोलीस स्टेशनला प्रत्यक्ष भेट देऊन पोलिस अधिकाऱ्यांशी संवाद साधल्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातील ज्ञानासोबतच प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळाली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये कायद्याविषयी आदर, सामाजिक जाणीव, संवादकौशल्य आणि आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली. तसेच पोलीस आणि नागरिक यांच्यातील परस्पर सहकार्याचे महत्त्वही विद्यार्थ्यांना समजले.

श्री आर. एम. इंगोले हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक सचिन इंगोले, पर्यवेक्षक हरीश रोकडे आणि मार्गदर्शक शिक्षक सुबोध देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांना समाजातील विविध घटकांच्या कार्याची ओळख करून देऊन त्यांच्यात जागरूकता आणि सामाजिक बांधिलकी निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम उपयुक्त ठरला.

# आगामी निवडणुकांसाठी नवीन 'एस-३' मतदान यंत्रांचे प्रशिक्षण नागपुरात संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने नवीन 'एस-३' प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचे कामकाज आणि यंत्रांच्या व्यवस्थापनासाठी विकसित करण्यात आलेल्या 'ईएमएस' सॉफ्टवेअर प्रणालीबाबत जिल्हास्तरीय प्रशिक्षण आज जिल्हा नियोजन भवन, सदर, नागपूर येथील नियोजन सभागृहात आयोजित करण्यात आले. राज्य निवडणूक आयोगाचे अवर सचिव शैलेंद्र वराडे, कक्ष अधिकारी समीर राणे आणि ईव्हीएम समन्वयक गौरव बडोदेकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच मे. ईसीआयएल, हैदराबादच्या तज्ज्ञ अभियंत्यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन केले. तसेच ईव्हीएम ठेवण्यात येत असलेल्या



गोडाऊनची तपासणी सुद्धा करण्यात आली.

राज्य निवडणूक आयोगाने ईसीआयएल कंपनीकडून नवीन 'एस-३' प्रकारची मतदान यंत्रे उपलब्ध करून दिली आहेत. त्यानुसार नागपूर जिल्ह्यासाठी ३ हजार कंट्रोल युनिट, १००० बॅलेट युनिट आणि १००० एसएमएम प्राप्त झाले आहेत. या यंत्रांचे व्यवस्थापन, नोंदणी आणि संबंधित कामकाज अधिक सुलभतेने करण्यासाठी ईसीआयएलने ईएमएस प्रणाली विकसित केली आहे.

या प्रशिक्षणात राज्य निवडणूक आयोगाकडून नवीन मतदान यंत्रांची कार्यपद्धती, ईएमएस प्रणालीचा वापर आणि निवडणुकीच्या अनुषंगाने आवश्यक तांत्रिक प्रक्रियांची माहिती देण्यात आली. ईसीआयएलच्या तज्ज्ञ अभियंत्यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून यंत्रांचे कार्य आणि प्रणालीच्या वापराबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच राज्य निवडणूक आयोगाचे अवर सचिव वराडे यांनी उपस्थितांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे ही दिली.

या प्रशिक्षणामध्ये नवीन मतदान यंत्रांचे तांत्रिक बारकावे, त्यांचे व्यवस्थापन आणि प्रत्यक्ष हाताळणी यावर भर देण्यात आला. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अधिकारी व कर्मचाऱ्यांना नवीन यंत्रणा आणि सॉफ्टवेअर प्रणालीची प्रभावीपणे हाताळणी करता यावी, हा या प्रशिक्षणाचा उद्देश होता.

नागपूर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या आदेशानुसार प्रशिक्षणाच्या नियोजनासाठी डॉ. रचना इंदुरकर, तहसीलदार श्रद्धा बागराव स्वतंत्र नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. समन्वयासाठी नायब तहसीलदार विनोद थोरवे (उमरेड) आणि चंद्रकांत पाडोळे यांनी नोडल अधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळली.

नवीन एस-३ मतदान यंत्रे आणि ईएमएस प्रणालीच्या प्रशिक्षणामुळे निवडणूक यंत्रणेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांची तांत्रिक तयारी अधिक सक्षम होण्यास मदत होणार असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे नियोजन आणि व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे करता येणार आहे.

### थोडक्यात

## ऐतिहासिक हडपक्या गणेशोत्सवच्या निमित्ताने श्रीमंत राजे मुधोजी भोसले यांच्या हस्ते पत्रकार रमेश लांजेवार यांचा सत्कार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्राची उपराजधानी व भौगोलिक दृष्ट्या भारताचा केंद्रबिंदू असलेल्या नागपूर येथे २३९ वर्षांची वैभवशाली ऐतिहासिक



परंपरा व संस्कृतीची ओळख भोसले राजघराण्याच्या वतीने जपण्याचे काम भोसले राजघराणे महाराजा ऑफ नागपूर ट्रस्टच्या वतीने सिनियर भोंसला पॅलेस महाल,नागपूर येथे संस्थापक अध्यक्ष श्रीमंत राजे मुधोजी महाराज भोसले यांच्यावतीने दरवर्षी होत असते. या अनुषंगाने मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक कार्यक्रम होतात. त्याचप्रमाणे ऐतिहासिक वारसा पहाण्यासाठी राज्यातील अनेक मान्यवर व भक्तगण सिनियर भोंसला पॅलेस महाल नागपूर येथे हडपक्या गणरायाचे दर्शन घेण्यासाठी येतात आणि वैभवशाली संस्कृतीचे दर्शन घेतात.

याप्रसंगी महाराजा ऑफ नागपूर ट्रस्ट हडपक्या गणेशोत्सवाच्या वतीने अनेक मान्यवरांचा सत्कार करण्यात येतो. याप्रसंगी लेखक-पत्रकार रमेश लांजेवार यांनी गेल्या २५ वर्षांपासून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय आणि आध्यात्मिक अशा अनेक विषयांवर पत्रकारितेच्या माध्यमातून अनेक वृत्तपत्रांच्या माध्यमातून लेखन केले याच अनुषंगाने हडपक्या गणेशोत्सवाच्या निमित्ताने त्यांचे कौतुक करून श्रीमंत राजे मुधोजी भोसले यांच्या हस्ते पत्रकार रमेश लांजेवार यांचा सत्कार करण्यात आला.

## रामटेक तालुक्यात नवरात्रोत्सवाची तयारी, देवी मंदिरे सजली, पोलीस प्रशासन सज्ज

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

शारदीय नवरात्र उत्सवाच्या पार्श्वभूमीवर रामटेक तालुक्यातील प्रमुख देवी मंदिरांमध्ये जय्यत तयारी सुरू झाली आहे. तालुक्यातील माँ कालंका माता मंदिर, शीतला माता मंदिर, गायत्री



माता मंदिर, शास्त्री वॉर्ड माता मंदिर, शिवनगर-परसोडा माता मंदिर, माँ कुमारिका बाहुली माता मंदिर, मातापुरा देवी माता मंदिर, एकविरा माता मंदिर, कोहाड माता मंदिर, माँ बम्लेश्वरी माता मंदिर, शिवगौरी देवी माता मंदिर माहुली, वैष्णोदेवी माता मंदिर मनसर तसेच नगरधन किल्ल्यातील माँ भवानी मंदिर येथे घटस्थापनेच्या तयारीने मंदिरे सजली आहेत.

गेल्या काही दिवसांपासून मंदिर परिसरात रंगरंगोटी, विद्युत रोषणाई, फुलांची आकर्षक सजावट आणि भव्य मंडप उभारणीची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. रामटेक हे धार्मिक नगरी म्हणून ओळखले जात असल्याने दरवर्षी नवरात्रीत हजारो भाविक देवी दर्शनासाठी येतात. यंदा गर्दी अधिक वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन उत्सव मंडळांनी विशेष नियोजन केले आहे. तालुक्यातील बहुतेक ठिकाणी नऊ दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज सकाळ-संध्याकाळ महाआरती, देवी जागरण, गरबा-रास, भजन स्पर्धा, महाप्रसाद वाटप असे कार्यक्रम होणार आहेत. नगरधन किल्ल्यातील माँ भवानी मंदिरात गेल्या २६ वर्षांपासून सुरू असलेल्या परंपरेनुसार यंदाही भव्य जागरण, महाकाल तांडव आणि प्रसिद्ध रील स्टार्सचा कार्यक्रम होणार आहे. दरम्यान, नवरात्र उत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस प्रशासन सज्ज झाले आहे. रामटेकचे उपविभागीय पोलीस अधिकारी रमेश बरकते यांच्या मार्गदर्शनाखाली रामटेकचे पोलीस निरीक्षक राजेकुमार थोरात यांनी चोख पोलीस बंदोबस्ताचे नियोजन केले आहे.

रामटेक शहरासह नगरधन, मनसर, देवलापार, शिवनगर-परसोडा अशा गर्दीच्या ठिकाणी अतिरिक्त पोलीस कर्मचारी, महिला पोलीस, होमगार्ड तैनात करण्यात येणार आहेत. मंदिर परिसरात सीसीटीव्ही, बॅरिकेट्स, पार्किंग व्यवस्था आणि भाविकांसाठी रांगा लावण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

भाविकांनी अफवांवर विश्वास न ठेवता शांततेत आणि सहकार्याने दर्शन घ्यावे, असे आवाहन पोलीस प्रशासन आणि उत्सव मंडळांच्या वतीने करण्यात आले आहे.

## गुरुकुल अकॅडमीमध्ये पालकांसाठी विशेष मार्गदर्शन सत्र




**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

पिपळा डाक बंगला येथील गुरुकुल अकॅडमी अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये मुलांची मानसिकता, पालकत्व, पालकांची जबाबदारी तसेच मुलांचे पोषण व विकास या विषयांवर विशेष मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले. यावेळी प्रमुख वक्त्या डॉ. अश्विनी बिजापूरकर जोशी (फॅमिली सायकॉलॉजिस्ट व पॅरेंटिंग कोच) आणि डॉ. निलेश कुंभारे (बालरोगतज्ज्ञ) यांनी मुलांचे मानसिक आरोग्य, मोबाईलचे व्यसन, संतुलित आहार, किशोरवयीन मुलांचे भावविश्व आणि पालक-मुलांमधील संवाद याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योगेश लोहकरे, तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. चंदू पाटील व मुख्याध्यापिका दुर्गा लोहकरे उपस्थित होत्या. पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सत्राचा लाभ घेतला. सूत्रसंचालन दिव्या काकडे यांनी केले, तर आभार अंजना यादव यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## नगरधनच्या ऐतिहासिक किल्ल्यात माँ भवानीचा नवरात्रोत्सव भक्तीमय वातावरणात सुरू

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

रामटेक तालुक्यातील प्राचीन व ऐतिहासिक नगरधन किल्ल्यात वसलेल्या जागृत माँ भवानी मंदिरात आज शनिवारपासून शारदीय नवरात्रोत्सवाला मोठ्या भक्तिभावात प्रारंभ होत आहे. सकाळी विधिवत घटस्थापनेने या नऊ दिवसीय महोत्सवाची सुरुवात होणार आहे.

जय माँ भवानी नवरात्र उत्सव मंडळ, किल्ला नगरधन यांच्या वतीने गेल्या २६ वर्षांपासून अखंडपणे हा उत्सव साजरा केला जात असून, यंदाही भाविकांसाठी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. श्रद्धा, भक्ती आणि परंपरेचा त्रिवेणी संगम



असलेला हा उत्सव केवळ नगरधनच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यासह विदर्भात प्रसिद्ध आहे. नवरात्र काळात देवीच्या दर्शनासाठी दरवर्षी हजारो भाविक किल्ल्यावर दाखल होतात, त्यामुळे यंदाही मोठी गर्दी होण्याची शक्यता आयोजकांनी वर्तवली आहे. गर्दीच्या पार्श्वभूमीवर किल्ला परिसरात चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे.

**विविध कार्यक्रमांची मेजवानी –**

उत्सवादरम्यान १३ तारखेला प्रसिद्ध सोशल मीडिया रील स्टार हर्ष, प्रभात, संतोष व अन्य इन्फ्लुएन्सर्स यांचा लाईव्ह संवाद कार्यक्रम होणार आहे. १६ तारखेला कोलकात्याचे सुप्रसिद्ध गायक अमन परवाना व देवजीत चक्रवर्ती यांचा भव्य देवी जागरणाचा कार्यक्रम रंगणार आहे. तर १७ तारखेला छिंदवाडाच्या सर्वश्रेष्ठ महाकाल ग्रुप तर्फे थरारक महाकाल तांडव सादर करण्यात येणार आहे.

याशिवाय दररोज देवीची आरती, रास गरबा, देवी जागरण आणि महाकाल तांडव यांसारख्या कार्यक्रमांमुळे नवरात्र नऊ दिवस भक्तीमय वातावरण राहणार आहे.

हा उत्सव यशस्वी करण्यासाठी मंडळाचे उपाध्यक्ष प्रशांत कामडी, सचिव शंकर होलगिरे व पिंटू नंदनवार यांनी विशेष प्रयत्न केले असून, नगरधनसह रामटेक तालुक्यातील उत्सव ठिकाणी रामटेकचे उपविभागीय पोलीस अधिकारी रमेश बरकते यांच्या मार्गदर्शनाखाली रामटेकचे पोलीस निरीक्षक राजेशकुमार थोरात चोख पोलीस बंदोबस्ताचे आयोजन केले आहे. तर दूरवरच्या भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## नागपूर जिल्ह्यात बोअरवेल खोदकामांवर पुढील आदेशापर्यंत बंदी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

यंदा अपुरे पर्जन्यमान व जलाशयांतील कमी पाणीसाठ्यामुळे जिल्ह्यात निर्माण होणाऱ्या संभाव्य पाणीटंचाईचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून जिल्ह्यात बोअरवेल खोदकामांवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम,२००५ च्या तरतुदींनुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष कुमार आशीर्वाद यांनी नागपूर जिल्ह्यातील बोअरवेल खोदकामांवर बंदी घालण्याचे आदेश जारी केले आहेत. भूजल स्त्रोतांचे संरक्षण, पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांवरील अतिरिक्त ताण कमी करणे व येणाऱ्या काळातील पाणीटंचाईची तीव्रता रोखण्यासाठी शासकीय यंत्रणांमार्फत प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहे.

जिल्ह्यातील संपूर्ण शहरी व ग्रामीण क्षेत्रात हा आदेश लागू करण्यात आला असून सर्व प्रकारच्या नवीन बोअरवेल/कूपनलिका खोदकामांवर तसेच विद्यमान बोअरवेल अधिक खोल करण्याच्या कामांवर तात्काळ प्रभावाने पुढील आदेशापर्यंत बंदी घालण्यात आली आहे. ही बंदी खासगी व्यक्ती, शेतमालक, गृहनिर्माण संस्था, बांधकाम व्यावसायिक, उद्योग, व्यावसायिक आस्थापना, संस्था तसेच बोअरवेल खोदकाम करणारे कंत्राटदार, रिगमालक व यंत्रचालक यांना लागू राहील.

# ताडोबात वन्यजीव सप्ताह उत्साहात : संवर्धनासाठी योगदान देणाऱ्यांचा गौरव

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर -धनंजय पांढरे**

जंगलाचे रक्षण, वन्यजीवांचे संवर्धन, वनवणव्यांवर नियंत्रण आणि मानव-वन्यजीव संघर्षाचे व्यवस्थापन यामध्ये मोलाची भूमिका बजावणाऱ्या वन अधिकारी, कर्मचारी आणि गावकऱ्यांच्या कायार्चा ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात गौरव करण्यात आला. वन्यजीव सप्ताह २०२६ निमित्त आयोजित विशेष पुरस्कार वितरण सोहळ्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गावांना, वन कर्मचाऱ्यांना आणि निसर्ग मार्गदर्शकांना सन्मानित करण्यात आले. वनसंवर्धनाच्या कार्यात स्थानिक नागरिकांचा सहभाग किती महत्त्वाचा आहे, हे या सोहळ्याच्या माध्यमातून अधोरेखित झाले.

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्यावतीने आयोजित या कार्यक्रमाला क्षेत्र संचालक प्रभू नाथ शुक्ला, उपसंचालक आनंद रेड्डी, विभागीय वन अधिकारी सचिन शिंदे आणि वन विकास महामंडळाच्या प्रादेशिक व्यवस्थापक दिव्या भारती उपस्थित होत्या.

सहाय्यक वनसंरक्षक, वनपरिक्षेत्र



अधिकारी, प्राथमिक प्रतिसाद पथकांचे सदस्य, इको-डेव्हलपमेंट समित्यांचे पदाधिकारी, सरपंच आणि विविध गावांतील प्रतिनिधींनीही कार्यक्रमाला उपस्थिती दर्शविली.

वनसंवर्धन आणि ग्रामविकासाच्या कामात उत्कृष्ट योगदान दिल्याबद्दल खडसंगी वनपरिक्षेत्रातील सातारा गावाच्या इको-डेव्हलपमेंट समितीने संपूर्ण व्याघ्र प्रकल्प स्तरावर प्रथम क्रमांक मिळविला. गावकऱ्यांचा सहभाग, वनसंरक्षणासाठी केलेले प्रयत्न आणि संवर्धनविषयक उपक्रमांमधील सक्रियता यांची दखल घेऊन समितीला गौरविण्यात आले. याशिवाय पळसगाव वनपरिक्षेत्रातील पळसगाव, शिवणी वनपरिक्षेत्रातील पांगडी, मूल वनपरिक्षेत्रातील मारोडा, मोहर्ली वनपरिक्षेत्रातील मोहर्ली, चंद्रपूर बफर वनपरिक्षेत्रातील मामला आणि ताडोबा कोअर वनपरिक्षेत्रातील घोसरी येथील इको-डेव्हलपमेंट समित्यांचाही उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मान करण्यात आला.

वनसंवर्धनाबरोबरच गावां मधील एकोपा आणि परस्पर सहकार्य वाढविण्यासाठी बफर क्षेत्रातील इको-डेव्हलपमेंट समित्यांच्या माध्यमातून विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये मोहर्ली वनपरिक्षेत्रातील मुधोली गावाने कबड्डीमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. चंद्रपूर बफर वनपरिक्षेत्रातील पेठ गावाने व्हॉलीबॉल स्पर्धेत विजय मिळविला, तर हळदी गावाने रस्सीखेच स्पर्धेत बाजी मारली. या स्पर्धांमुळे ग्रामस्थांमध्ये उत्साह निर्माण होण्याबरोबरच सामुदायिक सहभागालाही चालना मिळाली.

जंगलातील वनवणव्यांमुळे वन्यजीवांच्या अधिवासाला आणि जैवविविधतेला मोठा धोका निर्माण होतो. ही बाब लक्षात घेऊन 'फायर-फ्री ताडोबा' उपक्रमांतर्गत वनवणवे रोखण्यासाठी विशेष प्रयत्न करणाऱ्या गावांचा रोख पारितोषिक आणि चषक देऊन गौरव करण्यात आला. या स्पर्धेत मूल वनपरिक्षेत्रातील फुलझरी गावाने प्रथम क्रमांक पटकावला. गावाला ५१ हजार रुपये रोख पारितोषिक आणि भव्य चषक प्रदान करण्यात आला. ताडोबा वनपरिक्षेत्रातील सोनेगावने द्वितीय क्रमांक मिळवत ३१ हजार रुपयांचे, तर खडसंगी वनपरिक्षेत्रातील अलीझंझा गावाने तृतीय क्रमांक मिळवत २१ हजार रुपयांचे पारितोषिक पटकावले. वनवणव्यांवर नियंत्रण मिळविण्यासाठी गावपातळीवर जागरूकता निर्माण करणे आणि वन्यजीवांचा नैसर्गिक अधिवास सुरक्षित ठेवणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

वन्यप्राण्यांच्या हालचाली आणि मानवी वस्त्यांजवळ निर्माण होणाऱ्या संघर्षाच्या परिस्थितीत प्राथमिक प्रतिसाद पथके महत्त्वाची भूमिका बजावतात. बफर क्षेत्रातील विविध गावांमध्ये कार्यरत असलेल्या या पथकांच्या योगदानाची दखल घेत सात पथकांना सन्मानित करण्यात आले. यामध्ये मोहर्ली वनपरिक्षेत्रातील सितारामपेठ, शिवणी वनपरिक्षेत्रातील कुकडहेती, चंद्रपूर बफर वनपरिक्षेत्रातील निंबाळा, पळसगाव वनपरिक्षेत्रातील पारणा, खडसंगी वनपरिक्षेत्रातील तळोधी तुकूम, मूल वनपरिक्षेत्रातील भादुर्णी आणि ताडोबा वनपरिक्षेत्रातील विलोदा येथील पथकांचा समावेश होता.

स्थानिक नागरिकांची सुरक्षितता आणि वन्यजीवांचे संरक्षण या दोन्ही बाबी लक्षात घेऊन ही पथके कार्यरत आहेत. जंगलात प्रत्यक्ष काम करताना अनेक आव्हानांना सामोरे जाणाऱ्या वन अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचाही या सोहळ्यात गौरव करण्यात आला. वाघांचे निरीक्षण, नियमित गस्त, वनसंरक्षण, अतिक्रमण हटविणे आणि संरक्षण कुट्यांची देखभाल अशा विविध कामांतील उत्कृष्ट कामगिरीसाठी पुरस्कार प्रदान करण्यात आले. उत्कृष्ट वनपाल श्रेणीत मोहर्ली वनपरिक्षेत्रातील संजय जुमडे यांनी प्रथम क्रमांक मिळविला. वाघांचे निरीक्षण, गस्त, गर्दीचे व्यवस्थापन आणि वनसंरक्षणातील त्यांच्या कायार्ची दखल घेण्यात आली. कुकडहेती येथील क्षेत्र सहाय्यक भारत मडावी यांनी द्वितीय, तर मूल येथील क्षेत्र सहाय्यक रितेश बापूजी धुडसे यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

उत्कृष्ट वनरक्षक श्रेणीत पळसगाव वनपरिक्षेत्रातील पी. एन. जरारे यांना प्रथम पारितोषिक देण्यात आले. वन्यजीव संवर्धन, गस्त आणि वनसंरक्षण सुविधांची देखभाल यामधील त्यांच्या कामगिरीचा गौरव करण्यात आला.

खडसंगी वनपरिक्षेत्रातील एस. बी. लोखंडे यांना अतिक्रमण हटविण्यातील योगदानाबद्दल द्वितीय क्रमांक मिळाला. चंद्रपूर बफर वनपरिक्षेत्रातील वर्षा चरणदास वाघ यांना वाघांचे निरीक्षण आणि संरक्षण कुट्यांच्या देखभालीतील उत्कृष्ट कार्याबद्दल तृतीय पारितोषिक प्रदान करण्यात आले. मूल वनपरिक्षेत्रातील मारोडा संरक्षण कुटीच्या वाय. जी. मसराम आणि शिवणी वनपरिक्षेत्रातील पिपरहेटी संरक्षण कुटीचे नितेश नामावरे यांनाही संरक्षण कुट्यांची उत्कृष्ट देखभाल केल्याबद्दल विशेष सन्मानित करण्यात आले.

थोडक्यात

## महाराष्ट्र विद्यालयाचा कुशल आवळे राज्य स्पर्धेकरिता पात्र



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

स्थानिक जिल्हा क्रीडा संकुल भंडारा येथे संपन्न झालेल्या शालेय नागपूर विभागीय कुस्ती स्पर्धेत खापरखेडा येथील महाराष्ट्र विद्यालयातील कुस्तीगीर कुशल आवळे याने उल्लेखनीय कामगिरी करून १९ वर्ष वयोगटात ७४ किलो खाली वजन गटात प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदक प्राप्त केले. यापुर्वीही कुशल आवळे याने ज्युदो व रस्सीखेच राज्यस्तरीय स्पर्धेत प्राविण्य प्राप्त केले.मागील वर्षी शालेय रस्सीखेच स्पर्धा नांदेड येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत कुशलने सुवर्णपदक प्राप्त केले. सोबतच सत्र २०२३-२४ शालेय ज्युदो स्पर्धा अमरावती येथे त्यांनी आपल्या वजन गटात रौप्य पदक प्राप्त केले.

कुशल अहिल्यानगर येथे होणाऱ्या शालेय राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत सहभागी होणार असून कुशल यास क्रीडाशिक्षक धैर्यशील सुटे यांचे मार्गदर्शन लाभले. महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक व विश्वस्त सुनिलभाऊ केदार,अध्यक्ष सुधीर केदार, विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण वडस्कर, उपमुख्याध्यापक जितेंद्र ठाकरे,पर्यवेक्षक नरेंद्र माहूरतळे, क्रीडा शिक्षक धैर्यशील सुटे, धर्मेंद्र सूर्यवंशी, सर्व शिक्षक वृंद व कर्मचारी वर्ग यांनी विजयी वेटलिफ्टरचे अभिनंदन केले.

## इंद्रधनुष्य युवा महोत्सवात नटराज आर्ट अँड कल्चर सेंटरची बाजी

### १८ पारितोषिकांसह सलग तिसऱ्यांदा 'ओव्हरऑल चॅम्पियनशिप'



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठातर्फे आयोजित इंद्रधनुष्य युवा महोत्सवाच्या निवड फेरीत नटराज आर्ट अँड कल्चर सेंटरने घवघवीत यश संपादन केले. महाविद्यालयाच्या ६० विद्यार्थ्यांनी ११ विविध स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवून एकूण १८ पारितोषिके पटकावली. विशेष म्हणजे, सलग तीन वर्षे ओव्हरऑल चॅम्पियनशिप जिंकण्याचा विक्रम महाविद्यालयाने आपल्या नावावर केला आहे. या महोत्सवात भारतीय समूह लोकनृत्य, मूकाभिनय, प्रहसन, भारतीय समूह गायन, ऑन द स्पॉट पेंटिंग, क्ले मॉडेलिंग, फोटोग्राफी, कार्टूनिंग, कोलाज मेकिंग, पोस्टर मेकिंग आणि रांगोळी अशा ११ स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांकासह द्वितीय आणि तृतीय क्रमांकाची पारितोषिके मिळवत विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांची चमक दाखवली. नोव्हेंबर मध्ये नाशिक येथे होणाऱ्या इंद्रधनुष्य युवा महोत्सवासाठी ३० विद्यार्थी पात्र ठरले आहेत.

या यशाबद्दल धरमपेठ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष उल्हास औरंगाबादकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. संस्थेचे सचिव सुरेश देव आणि नटराज आर्ट अँड कल्चर सेंटरचे समन्वयक संजीव देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविंद्र हरिदास यांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे आणि जिद्दीचे कौतुक केले. महाविद्यालयाच्यावतीने मौक्तीक काटे आणि सौ. पल्लवी पारस्कर यांनी टीम मॅनेजर म्हणून जबाबदारी सांभाळली. या यशासाठी प्रा. जय गाला, प्रा. स्वप्निल खरे, प्रा. तुषार राऊत, प्रा. विलास महाजन, प्रा. शाकंबरी तिवारी, प्रा. दर्शन उडोले, शिवम मस्के आणि दर्शन कडाव यांनी विशेष परिश्रम घेतले.

## विद्यार्थ्यांसाठी स्वरचित काव्यवाचन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

बालकला अकादमी नागपूर, स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाल परिसरातील श्रीमती दादीबाई देशमुख हिंदू मुलींची शाळेत शालेय विद्यार्थ्यांसाठी स्वरचित बालकाव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेत ३० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग होत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूरचे अध्यक्ष रवींद्र फडणवीस होते तर बालकला अकादमीच्या सदस्या सीमा फडणवीस, शाळेच्या मुख्याध्यापिका माया बमनोटे यांची प्रमुख उपस्थिती होती. ही स्पर्धा दोन गटात घेण्यात आली. अ गट प्रथम पारितोषिक धरा झा, द्वितीय धृवी रायटर, तृतीय आभा राऊत, प्रोत्साहनपर पहिले अनिकेथ कोल्हेकर, प्रोत्साहनपर दुसरे एंजल कोहाड यांनी पटकावले. ब गटात प्रथम पारितोषिक मनस्वी पाथोडे, द्वितीय पारितोषिक कार्तिक काकडे, तृतीय पारितोषिक मृणाक्षी खेवले यांनी तर प्रोत्साहन पर पहिले पूर्वी पौनीकर, प्रोत्साहन पर दुसरे रिया हेंडवे यांनी पटकावले. या स्पर्धेचे परीक्षण वंदना देशपांडे आणि विशाल देवतळे यांनी केले. संचालन व आभार प्रदर्शन राजेश सुलभेवार यांनी केले. कार्यक्रमाला शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# शैलपुत्री देवी : अंतर्मुख होण्याची हाक

## श्रद्धेच्या प्रतिकातून समाज परिवर्तनत



**नवरात्र विशेष-१**

**शशिकांत तोटे, यवतमाळ - ९१३०८३५४५८**

आज शारदीय नवरात्रोत्सवाचा पहिला दिवस. शक्तीच्या उपासनेचा हा प्रारंभ. या दिवशी आदिशक्तीच्या नऊ रूपांपैकी प्रथम रूप असलेल्या शैलपुत्री देवीची आराधना केली जाते. 'शैल' म्हणजे पर्वत आणि 'पुत्री' म्हणजे कन्या. पर्वतराज हिमालयाची कन्या म्हणून शैलपुत्रीचे रूप श्रद्धेने पूजले जाते. वृषभावर आरूढ, एका हातात त्रिशूल आणि दुसऱ्या हातात कमळ धारण केलेली ही देवी केवळ धार्मिक प्रतीक नाही. तिच्या रूपात स्थैर्य, धैर्य, निसगार्शी नाते, संघर्षशीलता आणि स्त्रीशक्तीचा व्यापक अर्थ सामावलेला आहे.

पर्वत म्हणजे अढळपणाचे प्रतीक. ऋतू बदलतात,वादळे येतात,पाऊस कोसळतो;तरी पर्वत आपल्या जागेवर स्थिर राहतो. शैलपुत्रीचे हे रूप जीवनातील संकटांकडे पाहण्याची नवी दृष्टी देते. आजचे जीवन वेगवान झाले आहे. स्पर्धा, क्षणिक यशाची अपेक्षा, शॉर्टकटची मानसिकता, बदलती नाती आणि अस्थिर कुटुंबव्यवस्था यामुळे मनाचे स्थैर्य हरवत चालले आहे. छोट्याशा अपयशाने खचणे किंवा अडचणींपासून पळ काढणे वाढत आहे. अशावेळी शैलपुत्री सांगते, परिस्थिती कितीही कठीण असली तरी मूल्ये आणि विवेक यांची साथ सोडू नका. संकटांपासून दूर जाण्यापेक्षा त्यांना सामोरे जाण्यातच खरे सामर्थ्य आहे. या देवीचे पर्वताशी असलेले नाते आपल्याला निसर्गाची आठवण करून देते. पर्वत, माती, जंगल, जल आणि भूमी यांना भारतीय संस्कृतीने पूजनीय स्थान दिले. नद्या माता झाल्या, वृक्ष देवत्वाचे प्रतीक ठरले आणि भूमीला मातेसमान मानले गेले. मात्र विकासाच्या अंध शर्यतीत हे नाते कमकुवत झाले आहे. डोंगर फोडले जात आहेत, जंगलांचा ऱ्हास होत आहे, नद्या प्रदूषित होत आहेत आणि भूजलाचा अमर्याद वापर केला जात आहे.

म्हणून शैलपुत्रीची आराधना केवळ फुले,नैवेद्य आणि आरतीपुरती मर्यादित राहू नये. पर्वतांचे रक्षण, वृक्षसंवर्धन, पाण्याची बचत आणि पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे हीदेखील तिचीच उपासना आहे. देवीसमोरचा दिवा क्षणभर उजेड देतो; पण पर्यावरण संवर्धनाची कृती अनेक पिढ्यांचे भविष्य सुरक्षित करू शकते. शैलपुत्रीच्या हातातील त्रिशूल अन्यायाविरुद्धच्या संघर्षाचे प्रतीक मानता येईल. समाजात हिंसा, शोषण, भेदभाव, व्यसनाधीनता आणि अंधश्रद्धेची विविध रूपे आजही दिसतात. त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे सोपे; पण त्याविरुद्ध भूमिका घेणे आवश्यक आहे. आपल्या आसपास एखाद्या स्त्रीवर अन्याय होत असेल, दुर्बल व्यक्तीचे शोषण होत असेल किंवा विषमता वाढत असेल, तर केवळ प्रेक्षक न राहता आवाज उठवणे हीच शक्तीची खरी साधना आहे.

दुसऱ्या हातातील कमळ माणसाला निर्मळतेचा संदेश देते. चिखलात उमलूनही कमळ त्याचा डाग अंगावर ठेवत नाही. त्याचप्रमाणे प्रतिकूल परिस्थितीतही मनातील सद्भाव आणि मूल्ये जपता आली पाहिजेत. समाजमाध्यमांवरील द्वेष, मत्सर आणि नकारात्मकतेच्या वातावरणात हा संदेश विशेष महत्त्वाचा ठरतो. शैलपुत्री देवीचे रूप स्त्रीसन्मानाची जाणीवही करून देते. देवीला शक्ती मानणाऱ्या समाजाने प्रत्येक स्त्रीला शिक्षण, सुरक्षितता, स्वावलंबन आणि निर्णयस्वातंत्र्य देणे गरजेचे आहे. मंदिरातील मूर्तीसमोर मस्तक झुकवण्यापेक्षा घरातील आणि समाजातील स्त्रीच्या सन्मानासाठी आपला अहंकार बाजूला ठेवणे अधिक अर्थपूर्ण आहे. नवरात्र हा केवळ उत्सव नाही;तो आत्मपरीक्षणाची संधी आहे.आपण संकटांसमोर किती खंबीर आहोत? निसर्गाशी आपले नाते किती जिवंत आहे? अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य आपल्यात आहे का?आणि स्त्रीला आपण प्रत्यक्ष जीवनात किती सन्मान देतो?

शैलपुत्री म्हणजे केवळ हिमालयाची कन्या नव्हे; ती पर्वतासारखे स्थैर्य, कमळासारखी निर्मळता आणि त्रिशूलासारखे धैर्य अंगीकारण्याची प्रेरणा आहे. आई जगदंबा आपणा सर्वांना सद्विचार, धैर्य, बळ आणि विवेक प्रदान करो!

## 'ललद्यदस ललबाय'मधील निवडक कवितांचे वामन पंडित यांनी केले अभिवाचन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

स्त्रीचे अस्तित्व, तिचे स्वातंत्र्य, आत्मभान आणि समाजातील तिचे स्थान यांचा शोध घेणाऱ्या स्त्रीवादी कवितांमधून स्त्रीजीवनाचे विविध पैलू उलगडणाऱ्या डॉ. मीनाक्षी पाटील यांच्या 'ललद्यदस ललबाय' या काव्यसंग्रहातील निवडक कवितांचे अभिवाचन नाट्यकर्मी आणि सांस्कृतिक कार्यकर्ते वामन पंडित यांनी केले. कवयित्री, चित्रकार आणि ललित लेखिका व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या सचिव डॉ. मीनाक्षी पाटील यांच्या 'ललद्यदस ललबाय' या काव्यसंग्रहातील निवडक कवितांचे अभिवाचनाचा कार्यक्रम शनिवारी कीर्तन केसरी भाऊसाहेब शेवाळकर सभागृहात पार पडला. नित्या आर्टिस्ट सेंटर, मुंबई व निलायम कृष्णकक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या काव्यसंग्रहात एकूण ३९ कविता असून, त्यांपैकी १५ कवितांचे अभिवाचन वामन पंडित यांनी केले. आजच्या काळात स्त्रियांच्या प्रश्नांचे चित्र विविध माध्यमांतून समोर येत आहे. एका बाजूला नाटक आणि साहित्याच्या माध्यमातून स्त्रियांची बाजू मांडली जाते, तर दुसरीकडे समाजमाध्यमांवर स्त्रीच्या प्रतिमेचे वस्तूकरण होताना दिसते. या विसंगत परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर 'ललद्यदस ललबाय'मधील कविता अधिक महत्त्वाच्या ठरतात, असे मत पंडित यांनी मांडले.

सुरुवातीला आशुतोष अडोणी यांनी डॉ. मीनाक्षी पाटील यांचा परिचय करून दिला. कवयित्रीच्या कवितेतील प्रमाण भाषेचा आणि बोलीभाषेच्या वापराचा विशेष उल्लेख करताना ते म्हणाले, कथाकथनाच्या स्वरूपातून उलगडत जाणारे काव्य, दृश्यात्मक अभिव्यक्ती आणि सुंदर असूनही अस्वस्थ करणारी रचना ही त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये आहेत. या प्रसंगी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांच्यासह श्याम माधव धोंड, विलास मानेकर, संजय आर्विकर, अविनाश महालक्ष्मे, निलेश खांडेकर आदींची उपस्थिती होती.

## 'बंगाल से बॉलिवूड तक'मधून उलगडला भारतीय सिनेसंगीताचा सुरेल प्रवास



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

बंगाली संगीतपरंपरेपासून बॉलिवूडमधील अजरामर गीतांपर्यंतचा भारतीय सिनेसंगीताचा सुरेल प्रवास शुक्रवारी 'बंगाल से बॉलिवूड तक' या विशेष संगीत कार्यक्रमातून उलगडला. 'स्वरशिल्प'तर्फे लक्ष्मीनगर येथील सायंटिफिक हॉलमध्ये आयोजित या मैफलीला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. जुन्या-नव्या लोकप्रिय गीतांनी सजलेल्या या कार्यक्रमातून बंगालच्या मातीतून येऊन भारतीय चित्रपटसृष्टीत आपले अढळ स्थान निर्माण करणाऱ्या दिग्गज कलाकारांना आदरांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमाची संकल्पना भाग्यश्री बारस्कर यांची होती तर सूत्रसंचालन श्वेता शेलगावकर यांनी केले.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून पियाली बिस्वास उपस्थित होत्या. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. भाग्यश्री बारस्कर यांनी ये जमीं गा रही है, या गीताने मैफलीचा प्रारंभ केला. त्यानंतर तनुजा सोनवणे यांनी भंवरे की गुंजन, मृदुला पाटणकर यांनी ठंडी हवा काली घटा, गौरी डोंगरे यांनी ना जिया लागे ना, तर भाग्यश्री बारस्कर यांनी घर मोरे परदेसी आणि दम मारो दम, ही गीते सादर केली. कीर्ती बोकाडे यांनी ये शाम मस्तानी, पद्मश्री देशपांडे यांनी जा रे उड़ जा रे पंछी आणि प्रविणा ढवळे यांनी ओ सजना बरखा, या गीतांतून रसिकांना मंत्रमुग्ध केले.

डॉ. नीता भावे, अमी पटेल, प्राजक्ता देशपांडे, संगीता शेकातकर, सरिता पंडित, वैशाली तालेवार, आशा अनासने, अरुणा मार्कंडे, डॉ. वैशाली खंडाईत, भारती देशपांडे, अंकिता सोमानी, राधिका रानडे, पल्लवी पशिने, अनिरुद्ध जोशी आणि मेघना जोशी यांनीदेखील विविध गीते सादर करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. अखेरीस चलते चलते, या गीताने मैफलीची सांगता झाली. महेंद्र ढोले, नंदू गोहणे, प्रशांत नागमोते आणि नितीन अहिरे यांनी वाद्यवृंदावर सुरेल साथसंगत केली.

## शिक्षणासाठी राबणाऱ्या जन्मदात्या बापावर पोटच्या मुलांचा जीवघेणा हल्ला

### खापरखेडा पोलीस स्टेशन हद्दीतील घटना

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

जन्मदात्या बापाचा निर्घृण खून केल्याची घटना गुरुवारला स्थानिक पोलीस स्टेशन हद्दीतील बाबूळखेडा चिचोली येथे घडली याप्रकरणाची शाही वाळत नाही तेच मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी दिवस-रात्र एक करणाऱ्या एका जन्मदात्या बापाला केवळ एका दुचाकीच्या क्षुल्लक कारणावरून पोटच्या मुलांनीच रक्ताच्या थारोळ्यात लोळवल्याची संतापजनक घटना खापरखेडा पोलीस स्टेशन हद्दीतील लोणखैरी येथे ९ ऑक्टोबर शुक्रवारला रात्रीच्या सुमारास घडली.

काठ्या, विटा आणि चामड्याच्या बेल्टने केलेल्या अमानुष मारहाणीत वडील गंभीर जखमी झाले असून, दोन्ही मुलांना खापरखेडा पोलिसानी बेड्या ठोकल्या आहे.

अर्जुन वासुदेव धुर्वे (२१) व करण वासुदेव धुर्वे (१९) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपी मुलांची नावे आहे तर वासुदेव धुर्वे (५०) हे या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या वडिलांचे नाव आहे.

प्राप्त माहितीनुसार शुक्रवारला रात्री ९ वाजताच्या सुमारास वासुदेव धुर्वे हे दिवसभराचे काम आटोपून घरी परतले होते घरी येताच आरोपी अर्जुन व करण या दोन्ही मुलांनी दुचाकी कुठे ठेवली? असा जाब विचारत वडील वासुदेव धुर्वे यांच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली यावेळी वासुदेव धुर्वे यांनी मी दिवसरात्र तुमच्या शिक्षणासाठी राब राब राबतो एवढा खर्च करतो व तुम्ही मला दुचाकीबद्दल विचारता? असे म्हटले.

यावेळी वडिलांचे उत्तर एकूण आरोपी अर्जुन व करण यांनी वासुदेव धुर्वे यांना रागाच्या लाकडी काठी, विटांचे तुकडे व कमरेचा बेल्ट काढून जबर मारहाण केली वासुदेव धुर्वे यांच्या डोक्यावर, मानेवर व शरीरावर गंभीर घाव लागल्यामूळे रक्ताच्या थारोळ्यात कोसळले.

यावेळी वडिलांचे उत्तर एकूण आरोपी अर्जुन व करण यांनी वासुदेव धुर्वे यांना रागाच्या लाकडी काठी, विटांचे तुकडे व कमरेचा बेल्ट काढून जबर मारहाण केली वासुदेव धुर्वे यांच्या डोक्यावर, मानेवर व शरीरावर गंभीर घाव लागल्यामूळे रक्ताच्या थारोळ्यात कोसळले.

याप्रसंगी वासुदेव धुर्वे यांचा किंचाळण्याचा आवाज ऐकून शेजारी धावून आले रक्तबंबाळ अवस्थेत वासुदेव धुर्वे यांना मेडिकल ट्रॉमा सेंटरमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात केले. वासुदेव धुर्वे यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. घटनेची माहिती मिळताच खापरखेडा पोलिसांनी घटनास्थळ गाठून दोन्ही मुलांना ताब्यात घेतले. पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९(१) आणि ३(५) अंतर्गत खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा नोंदवून अर्जुन व करण या दोघा भावांना अटक केली आहे. प्रकरणाचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बुवा यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अमोल पाटील करत आहेत.

## 'एनएच-४४'वरील प्रवासी सुविधा केंद्राची दुरवस्था!

### रात्री प्रवेशद्वार बंद, वीजपुरवठाही खंडित, प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

देशातील महत्त्वाच्या राष्ट्रीय महामार्गांपैकी एक असलेल्या एनएच-४४ वर महाराष्ट्राच्या हद्दीनंतर मनसर येथे प्रवाशांच्या सोयीसाठी उभारण्यात आलेले प्रवासी सुविधा केंद्र सध्या गैरसोयीचे केंद्र बनल्याचे चित्र आहे. रात्रीच्या वेळी या केंद्राचे प्रवेशद्वार बंद राहत असल्याची आणि वीजपुरवठा खंडित असल्याची माहिती समोर येत असल्याने लांब पल्ल्याचा प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसह प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.




प्रवाशांना प्रवासादरम्यान विश्रांती घेता यावी, यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून या सुविधा केंद्राची उभारणी करण्यात आली होती. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. प्रशस्त परिसर, वाहनांसाठी थांबण्याची व्यवस्था, ऊन-पावसापासून संरक्षणासाठी निवारा, तसेच स्वच्छतागृहे आणि स्नानगृह अशा सुविधांमुळे या केंद्राकडून प्रवाशांना मोठ्या अपेक्षा होत्या. मात्र, सध्याच्या परिस्थितीमुळे या अपेक्षांवर पाणी फिरल्याचे दिसत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, केंद्राचा वीजपुरवठा बंद असून रात्रीच्या वेळी संपूर्ण परिसरात अंधार असतो. त्यातच प्रवेशद्वार बंद असल्याने विश्रांतीसाठी येथे येणाऱ्या प्रवाशांना केंद्रात प्रवेश मिळत नसल्याची तक्रार आहे.

एनएच-४४ वरून रात्रीच्या वेळी प्रवास करणाऱ्या खासगी कार, बस आणि अन्य वाहनांतील प्रवाशांना विश्रांतीसाठी सुरक्षित जागेची आवश्यकता असते. मात्र, सुविधा केंद्राचे प्रवेशद्वार बंद आढळल्यास त्यांना महामार्गाच्या कडेला वाहने उभी करण्याची वेळ येऊ शकते. अंधारामुळे अपघाताचा धोका वाढण्याबरोबरच वाहनांच्या सुरक्षिततेबाबतही चिंता व्यक्त केली जात आहे. स्वच्छतागृहे आणि स्नानगृहांसारख्या सुविधा उपलब्ध असूनही रात्री त्यांचा वापर करता येत नसेल, तर या केंद्राच्या उभारणीचा मूळ उद्देशच निष्फळ ठरण्याची शक्यता आहे.

प्रवाशांना सुरक्षित विश्रांती, स्वच्छतागृहे आणि वाहनांसाठी योग्य जागा उपलब्ध करून देणे हा अशा केंद्रांच्या उभारणीमागील प्रमुख उद्देश असतो. मात्र, रात्रीच्या वेळी प्रवेशबंदी आणि वीजपुरवठ्याअभावी या सुविधा प्रत्यक्षात कितपत उपलब्ध आहेत, असा प्रश्न उपस्थित होत आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि रात्री प्रवास करणाऱ्या कुटुंबांना अशा परिस्थितीत अधिक अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

नागपूर जिल्हा हा केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचा गृहजिल्हा आहे. अशा महत्त्वाच्या राष्ट्रीय महामार्गावरील प्रवासी सुविधा केंद्राची देखभाल आणि नियमित कार्यान्वयन याकडे संबंधित विभागाने गांभीयार्ने लक्ष देण्याची गरज आहे. सार्वजनिक निधीतून उभारण्यात आलेल्या सुविधांचा प्रवाशांना प्रत्यक्ष लाभ मिळणे अपेक्षित आहे. स्थानिक नागरिकांनी या केंद्राचा वीजपुरवठा तातडीने पूर्ववत सुरू करावा, रात्रीच्या वेळी प्रवाशांना प्रवेश मिळेल अशी व्यवस्था करावी आणि स्वच्छतागृहे, स्नानगृहे, वाहनतळ यांसह सर्व सुविधा नियमितपणे उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी केली आहे.

लाखो रुपये खर्चून उभारलेल्या सुविधा केंद्राचा उपयोग प्रवाशांना सुरक्षितता आणि विश्रांती देण्यासाठी व्हायला हवा. त्याऐवजी प्रवाशांना रात्री महामार्गाच्या कडेला वाहने उभी करून अंधारात गैरसोय सहन करावी लागत असेल, तर ही बाब गंभीर आहे. त्यामुळे संबंधित प्रशासन या समस्येची दखल घेऊन मनसर येथील प्रवासी सुविधा केंद्र पुन्हा पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी कधी पावले उचलते, याकडे प्रवासी आणि स्थानिक नागरिकांचे लक्ष लागले आहे.

दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com दिनांक : रविवार, ११ ऑक्टोबर २०२६

थोडक्यात

## लाईन नसल्याने शेती कशी करायची सांगा साहेब, कृषी पंपासाठी किमान बारा तास विजपुरवठा करा!

### शेतकऱ्यांचे खांबाडा विज उपकेंद्राला घेराव



**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा**

शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांवर पाणी अभावी पिके करपत असताना एकीकडे वीज कृषी पंपांना मिळत नसल्याने हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांनी आक्रोश करत वरोरा तालुक्यातील खांबाडा येथील विज उपकेंद्राला घेराव घालत तिन तास ठिय्या आंदोलन करत १२ तास वीज पुरवठा देण्याची मागणी केली. खांबाडा वीज वितरण कंपनीच्या उपकेंद्रांतर्गत येणाऱ्या गावांमधील कृषी पंपांना पूर्वी १२ तास वीज पुरवठा मिळत होता. मात्र सध्या हा पुरवठा केवळ चार तास तासावर आल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला वारंवार निवेदने देऊनही महावितरण कडून या समस्येकडे दुर्लक्ष होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. वीज पुरवठा अपुरा असल्यामुळे पिकांचे सिंचन कसे करावे, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर निर्माण झाला आहे. केवळ आश्वासनांवर समाधान मानणार नसल्याची भूमिका शेतकऱ्यांनी घेतली कृषी पंपासाठी दिवसा १२ तास अखंडित वीजपुरवठा सुरू न झाल्यास पुन्हा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा आंदोलकांनी दिला.

आंदोलनात वडगाव,बारव्हा, मुरदगाव अंजनगाव, जामखुला, भोपापुर आणि खांबाडा येथील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते महावितरण प्रशासन आता या मागणीवर काय निर्णय घेते याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. शेतकऱ्यांचा वाढता संताप लक्षात घेऊन महावितरणचे उपकार्यकारी अभियंता सचिन बदखल, वरोरा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश सोनटक्के यांनी खांबाडा येथे भेट दिली. यावेळी उपकार्यकारी अभियंता सचिन बद्दखल यांना आंदोलनकर्त्यांनी निवेदन दिले व याबाबत शेतकऱ्यांची वीज पुरवठ्याबाबतची मागणी शासनाकडे पोहोचवणार असल्याचे आश्वासन उपकार्यकारी अभियंता बदखल यांनी दिले.

## सावनेरमध्ये पाटील हॉस्पिटलजवळ अपघात, युवकाच्या डोक्याला गंभीर दुखापत

### हितेश बनसोड आणि आकाश यादव यांची तत्परता, जखमीला तातडीने शासकीय रुग्णालयात केले दाखल

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

सावनेर पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या पाटील हॉस्पिटलजवळ शनिवार, दिनांक १० ऑक्टोबर २०२६ रोजी अंदाजे सकाळी ११:३० वाजताच्या सुमारास वाहनाचा अपघात झाला. या अपघातात हर्षल चांदुरकर,वय ३५ रा. माळेगाव, हे गंभीर जखमी झाले. त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने पुढील उपचारांसाठी त्यांना नागपूर येथील मेडिकल हॉस्पिटलमध्ये रेफर करण्यात आले. अपघाताची माहिती स्थानिक नागरिकांनी सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांना दिली. माहिती मिळताच हितेश बनसोड यांनी तात्काळ हितज्योती आधार फाउंडेशनच्या टीमसह घटनास्थळी धाव घेतली. हितेश बनसोड आणि आकाश यादव यांच्या मदतीने जखमी हर्षल चांदुरकर यांना तातडीने सावनेर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. जखमीची प्रकृती लक्षात घेऊन डॉक्टरांनी त्यांना पुढील उपचारांसाठी नागपूर येथील मेडिकल हॉस्पिटलमध्ये रेफर केले. अपघातग्रस्त वाहनाचा क्रमांक MH 49 DF 0854 असा आहे. हितेश बनसोड यांना मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, संबंधित वाहन स्पीड ब्रेकरवरून उसळल्यामुळे हा अपघात झाला असावा. मात्र, अपघात नेमका कसा घडला आणि त्यामागील कारण काय आहे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. याबाबत पोलीस तपासानंतरच वस्तुस्थिती समोर येणार आहे. अपघाताची माहिती मिळताच वेळ न दवडता घटनास्थळी पोहोचून जखमीला रुग्णालयात दाखल करण्याचे काम हितज्योती आधार फाउंडेशनच्या टीमने केले. सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड आणि आकाश यादव यांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे जखमीला तातडीने वैद्यकीय उपचार मिळवून देण्यासाठी मदत झाली.




# धार्मिक स्थळांना मालमत्ता करातून संपूर्ण सूट द्याः आ. विकास ठाकरे

### नागपूर महापालिकेकडून करदात्यांच्या पैशांची उधळपट्टी, मारबत महोत्सवावरील दोन कोटींहून अधिक खर्चावर सवाल

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शहरातील मंदिरे, बौद्ध विहार, मशिदी, दरगाह, चर्च, गुरुद्वारे आणि सर्व धर्मांच्या धार्मिक स्थळांना मालमत्ता करातून संपूर्ण सूट देण्याची मागणी पश्चिम नागपूरचे आमदार विकास ठाकरे यांनी केली आहे. धार्मिक स्थळांना लाखो आणि कोट्यवधी रुपयांच्या मालमत्ता कराची बिले पाठविणारी नागपूर महानगरपालिका दुसरीकडे करदात्यांच्या कष्टाच्या पैशांची उधळपट्टी करीत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. धार्मिक स्थळांवर कराचा बोजा लादण्याऐवजी महापालिकेने स्वतःच्या अनावश्यक खर्चाला आणि आर्थिक अपव्ययाला आळा घालावा, अशा शब्दांत ठाकरे यांनी महापालिकेच्या कारभारावर जोरदार टीका केली. यासंदर्भात आमदार ठाकरे यांनी नागपूर महापालिका आयुक्त डॉ. विपीन इटनकर यांना पत्र लिहिले असून, महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत सर्वसमावेशक धोरण तयार करून शहरातील सर्व धर्मांच्या धार्मिक स्थळांना मालमत्ता करातून सूट देण्याचा निर्णय घेण्याची मागणी केली आहे.

धार्मिक स्थळे ही केवळ प्रार्थना आणि उपासनेची केंद्रे नसून समाजाच्या श्रद्धेची, संस्कृतीची आणि सामाजिक एकात्मतेची प्रतीके आहेत. विविध धर्मांची ही सार्वजनिक धार्मिक स्थळे स्थानिक नागरिक, स्वयंसेवी संस्था, धार्मिक संघटना, सार्वजनिक ट्रस्ट आणि मंडळांच्या आर्थिक योगदानातून उभी राहिली आहेत. त्यांची देखभाल, दुरुस्ती, स्वच्छता आणि व्यवस्थापनासाठी नागरिकांकडून लोकवर्गणी व देणग्या गोळा केल्या जातात. कोणत्याही व्यावसायिक नफ्याच्या उद्देशाने नव्हे, तर समाजाच्या धार्मिक आणि सार्वजनिक गरजा पूर्ण करण्यासाठी ही स्थळे चालविली जातात. अशा धार्मिक स्थळांवर मालमत्ता कराचा आर्थिक बोजा टाकणे अन्यायकारक असून जनहिताच्या विरोधात असल्याचे ठाकरे यांनी म्हटले आहे.

धार्मिक स्थळांच्या परिसरात रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, पथदिवे आणि इतर आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही शासन व नागपूर महानगरपालिकेची जबाबदारी आहे. मात्र, ही जबाबदारी पार पाडण्याऐवजी महापालिकेकडून धार्मिक स्थळांना लाखो आणि कोट्यवधी रुपयांच्या मालमत्ता कराची बिले पाठविली जात आहेत. धार्मिक संस्था आणि नागरिकांच्या देणग्यांवर चालणाऱ्या या धार्मिक स्थळांकडून अशा प्रकारे कराची वसुली करणे कायद्याच्या दृष्टीनेही आक्षेपार्ह असल्याचे मत ठाकरे यांनी व्यक्त केले.



धार्मिक स्थळांना करमुक्त करण्यासाठी महापालिकेने आवश्यक कायदेशीर तरतुदींचा विचार करून ठोस धोरण निश्चित करावे. सर्व धर्मांच्या धार्मिक स्थळांना समान न्याय मिळाला पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

**मारबत महोत्सवाच्या नावाखाली दोन कोटींहून अधिक खर्च कशासाठी?**

नागपूर महानगरपालिकेकडून करदात्यांच्या पैशांचा होणारा अपव्यय हा अत्यंत गंभीर विषय असल्याचे सांगत विकास ठाकरे यांनी मारबत महोत्सवावरील खर्चाबाबत महापालिकेला धारेवर धरले. नागपूरचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा असलेला मारबत महोत्सव अनेक वर्षांपासून नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागातून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या महोत्सवासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळासारख्या शासकीय संस्थांकडूनही निधी खर्च केला जातो. असे असतानाही नागपूर महानगरपालिकेने मारबत महोत्सवावर तब्बल दोन कोटी रुपयांहून अधिक खर्च करण्याची आवश्यकता काय होती, असा सवाल ठाकरे यांनी उपस्थित केला.

विशेष म्हणजे, या महोत्सवात नागपूर महानगरपालिकेचे कोणतेही ठळक योगदान दिसून आले नाही. त्यामुळे दोन कोटींहून अधिक रकमेचा नेमका खर्च कुठे, कसा आणि कोणत्या कामांवर करण्यात आला, याबाबत गंभीर प्रश्न निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले. करदात्यांच्या पैशांच्या अशा वापराबाबत महापालिकेने उत्तरदायित्व स्वीकारले पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**कोट्यवधी खर्चून रस्ते बांधायचे आणि पुन्हा खोदायचे; हा कसला विकास?**

नागपूर महानगरपालिकेच्या नियोजनशून्य कारभारामुळे शहरातील विकासकामांवर होणाऱ्या कोट्यवधी रुपयांच्या खर्चाचीही विकास ठाकरे यांनी समाचार घेतला.

शहरात कोट्यवधी रुपये खर्च करून सिमेंट कॉंक्रिटचे रस्ते तयार केले जातात. मात्र, विविध विभागांमध्ये समन्वय नसल्याने आणि योग्य नियोजनाच्या अभावामुळे हेच रस्ते पुन्हा खोदले जातात. रस्त्यांच्या बांधकामावर जनतेचा पैसा खर्च करायचा आणि त्यानंतर पुन्हा खोदकाम करून त्याच पैशांचा अपव्यय करायचा, हा प्रकार जनतेच्या पैशांशी खेळ करण्यासारखा असल्याची टीका ठाकरे यांनी केली.

महापालिकेकडून सार्वजनिक निधीच्या अपव्ययाची ही केवळ काही उदाहरणे असून अशा प्रकारांची यादी मोठी आहे. धार्मिक स्थळांना मालमत्ता करातून सूट दिल्यामुळे महापालिकेच्या महसुलात होणाऱ्या संभाव्य घटीपेक्षा कितीतरी पटीने अधिक सार्वजनिक निधीचा अपव्यय अशा चुकीच्या निर्णयांमुळे आणि नियोजनशून्य कारभारामुळे होत असल्याचा आरोप त्यांनी केला. महापालिकेने धार्मिक स्थळांकडून कर वसूल करण्यावर भर देण्याऐवजी सार्वजनिक निधीच्या अपव्ययाला आळा घालण्यास प्राधान्य द्यावे, असे ठाकरे यांनी सुनावले.

**७०० चौरस फुटांपर्यंतच्या घरांनाही मालमत्ता करमाफी द्या!**

मुंबईच्या धर्तीवर नागपूर शहरातील ७०० चौरस फूट किंवा त्यापेक्षा कमी क्षेत्रफळ असलेल्या सर्व निवासी घरांना मालमत्ता करातून संपूर्ण सूट देण्याची मागणी आपण यापूर्वीही अनेकदा केली असल्याची आठवण आमदार विकास ठाकरे यांनी करून दिली.

महानगरपालिकेचे काम केवळ नागरिकांकडून कर वसूल करणे नसून त्यांना आवश्यक नागरी सुविधा पुरविणे, त्यांचे जीवनमान उंचावणे आणि आर्थिक दिलासा देणे हेही आहे. मात्र, नागपूर महानगरपालिकेकडून जनहिताचे निर्णय घेण्याऐवजी नागरिकांच्या खांद्यावर सातत्याने कराचा बोजा वाढविला जात असल्याची टीका त्यांनी केली.

"एकीकडे धार्मिक स्थळांना लाखो-कोटींच्या मालमत्ता कराची बिले पाठवायची आणि दुसरीकडे जनतेच्या पैशांची कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी करायची, हा विरोधाभास महापालिकेने थांबवला पाहिजे. करदात्यांच्या पैशांचा प्रत्येक रुपया जनहितासाठी खर्च झाला पाहिजे. नागपूर महानगरपालिकेने नागरिकांवर आर्थिक बोजा वाढविण्याऐवजी त्यांना दिलासा देणारी धोरणे राबवावीत. सर्व धर्मांच्या धार्मिक स्थळांना मालमत्ता करातून संपूर्ण सूट द्यावी, ७०० चौरस फुटांपर्यंतच्या घरांना करमाफी द्यावी आणि अनावश्यक खर्चाला तातडीने आळा घालावा," अशी मागणी आमदार विकास ठाकरे यांनी केली आहे.

## सोनपुरी परिसरात धान कापणी व मळणीला सुरुवात!

### सोनपुरी येथे शासकीय धान खरेदी केंद्र सुरू करण्याची शेतकऱ्यांची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

खरीप हंगामातील प्रमुख पीक असलेले धान आता पक्व होऊन कापणीसाठी तयार झाले आहे. सोनपुरी परिसरात धान पिकाच्या कापणीसह मळणीच्या कामालाही सुरुवात झाली आहे. शेतांमध्ये शेतकऱ्यांची लगबग वाढली असून गावागावांत धान कापणीचा उत्साह दिसून येत आहे. अनेक महिन्यांच्या मेहनतीनंतर हातात आलेले धान पीक पाहून शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान झळकत आहे.

**शेतांमध्ये कापणी व मळणीची लगबग**

सोनपुरी तसेच परिसरातील ग्रामीण भागात शेतकरी धान कापणी आणि मळणीच्या कामात व्यस्त झाले आहेत. काही ठिकाणी मजुरांच्या मदतीने, तर काही ठिकाणी कृषी यंत्रांच्या साहाय्याने कापणी केली जात आहे. हवामान अनुकूल राहिल्यास लवकरात लवकर कापणी व



मळणी पूर्ण करून धान सुरक्षित ठेवण्याचा शेतकऱ्यांचा प्रयत्न सुरू आहे.

**धानाला योग्य भाव मिळण्याची अपेक्षा**

धान पीक तयार झाल्याने शेतकऱ्यांचे लक्ष आता बाजारभाव आणि शासकीय धान खरेदी केंद्रांकडे लागले आहे. शासनाने धान खरेदी केंद्रे वेळेत सुरू करून शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य भाव द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सोनपुरी येथे शासकीय धान खरेदी केंद्र सुरू झाल्यास शेतकऱ्यांना आपले धान विक्रीसाठी दूरवरच्या बाजारपेठेत जाण्याची गरज भासणार नाही. सध्या सोनपुरी परिसरातील शेतकऱ्यांना धान विक्रीसाठी सुमारे ८ किलोमीटर अंतरावर जावे लागत आहे. त्यामुळे वाहतूक खर्चासह वेळेचा अपव्यय आणि विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे.

**अवकाळी पावसाची चिंता कायम**

धान कापणीच्या या महत्त्वाच्या टप्प्यावर हवामानाची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे. पाऊस पडल्यास कापून ठेवलेल्या धान पिकाचे नुकसान होण्याची तसेच धानाच्या गुणवत्तेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकरी लवकरात लवकर कापणी व मळणी पूर्ण करून धान सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत.

**सोनपुरी येथे शासकीय धान खरेदी केंद्र तातडीने सुरू करा!**

सोनपुरी परिसरातील शेतकऱ्यांची मागणी आहे की, शासनाने सोनपुरी येथे शासकीय धान खरेदी केंद्र तातडीने सुरू करावे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना धान विक्रीसाठी होणारा त्रास कमी होईल. तसेच खरेदी प्रक्रिया पारदर्शक ठेवून शेतकऱ्यांना निर्धारित हमीभावाचा लाभ वेळेत मिळावा, अशीही अपेक्षा व्यक्त होत आहे.

आता सोनपुरी येथे शासकीय धान खरेदी केंद्र कधी सुरू होणार आणि शेतकऱ्यांच्या मागणीला शासनाकडून कधी प्रतिसाद मिळणार, याकडे परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. सध्या सोनपुरी परिसरात धान कापणी व मळणीचा हंगाम सुरू झाला असून शेतकरी आपले पीक सुरक्षितपणे घरात आणण्यासाठी धडपड करीत आहेत.

## अनिल सोले माझे गुरु आणि ज्येष्ठ नेते, त्यांच्यावर अधिक बोलणे योग्य नाही : सुधाकर कोहळे

**दै.सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर पदवीधर मतदारसंघात महायुतीच्या विजयाचा विश्वास; पदवीधर मतदारांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचा दावा नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत भाजपचे उमेदवार सुधाकर कोहळे यांनी अनिल सोले यांच्या अपक्ष उमेदवारीवर प्रतिक्रिया व्यक्त करताना, सोले हे आपले गुरु आणि ज्येष्ठ नेते असल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांच्याबाबत अधिक भाष्य करणे योग्य ठरणार नसल्याचे कोहळे यांनी स्पष्ट केले. नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत महायुतीची ताकद आपल्या पाठीशी असून पदवीधर मतदारांकडून चांगला प्रतिसाद मिळत असल्याचा विश्वास कोहळे यांनी व्यक्त केला. मतदारांशी सातत्याने संपर्क ठेवणे आणि त्यांच्या समस्या समजून घेणे हे निवडणुकीत महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी नमूद केले.



२०२० मध्ये झालेल्या निवडणुकीत भाजपला या मतदारसंघात पराभवाचा सामना करावा लागला होता. या पार्श्वभूमीवर यावेळी मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि त्यांच्याशी संवाद वाढविण्यासाठी प्रयत्न केले जात असल्याचे कोहळे यांच्या वक्तव्यावरून स्पष्ट होते. दरम्यान, अनिल सोले यांनी अपक्ष उमेदवारी दाखल केल्याने नागपूर पदवीधर मतदारसंघातील निवडणुकीच्या राजकीय समीकरणांबाबत चर्चा सुरू झाली आहे. सोले यांच्या उमेदवारीचा निवडणुकीवर काय परिणाम होतो आणि मतदारांचा कौल कोणाच्या बाजूने लागतो, याकडे राजकीय वतुर्ळाचे लक्ष लागले आहे.

# विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी सातत्याने पाठपुरावा

### शिक्षण क्षेत्रातील कामांचा अभिजित वंजारी यांनी मांडला लेखाजोखा, महाज्योती, सारथी, बार्टीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दिलासा, नागपूर विद्यापीठासाठी १०७ कोटींचा निधी मंजूर

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या अधिकाधिक संधी उपलब्ध व्हाव्यात, संशोधनासाठी आर्थिक पाठबळ मिळावे आणि शैक्षणिक संस्थांच्या समस्या मार्गी लागाव्यात, यासाठी आमदारकीच्या सहा वर्षांच्या कार्यकाळात सातत्याने प्रयत्न केले. महाज्योती, सारथी आणि बार्टी या संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी तसेच पीएच.डी. अनुदानासाठी अर्थसंकल्पात वाढीव तरतूद करून घेण्यासोबतच वसतिगृहांचे प्रश्न, सार्वजनिक वाचनालयांचे अनुदान आणि दिव्यांगांना आधुनिक उपकरणे उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा केला, अशी माहिती नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार अभिजित वंजारी यांनी दिली.

नागपुरातील विविध शैक्षणिक संस्थांना भेटी देऊन शिक्षक, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी त्यांनी मागील सहा वर्षांत शिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी आणि विद्यार्थीहितासाठी केलेल्या कामांचा आढावा मांडला. शिक्षणाच्या संधी केवळ आर्थिक परिस्थितीमुळे मर्यादित राहू नयेत, विद्यार्थ्यांना स्पर्धेत टिकण्यासाठी आवश्यक सुविधा मिळाव्यात आणि शैक्षणिक संस्थांना सक्षम पायाभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यावर त्यांनी भर दिला.

**शिक्षण क्षेत्रासाठी निधीची तरतूद**

शिक्षण हे विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारे प्रभावी माध्यम आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रावर अधिकाधिक खर्च होणे आवश्यक आहे. नागपूर विद्यापीठाच्या विकासासाठी १०७ कोटी रुपये, तर टेक्नॉलॉजी पार्कसाठी ४४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेण्यात महत्त्वाची भूमिका बजावल्याचे



वंजारी यांनी सांगितले. विद्यापीठांचा विकास, संशोधनाला प्रोत्साहन आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नव्या संधी उपलब्ध करून देणे, ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**स्पर्धा परीक्षार्थींना वाचनालयांचा आधार**

ग्रामीण आणि शहरी भागांतील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी आवश्यक सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने सार्वजनिक वाचनालयांना ६० टक्के वाढीव अनुदान मिळवून देण्यासाठी पाठपुरावा केला. सार्वजनिक वाचनालये ही विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाची केंद्रे असून, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना त्यांचा मोठा लाभ होतो. वाचनालयांच्या माध्यमातून अभ्यासासाठी पोषक वातावरण निर्माण होण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले.

**वसतिगृहांपासून संशोधन अनुदानापर्यंत पाठपुरावा**

उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींमुळे शिक्षण अर्धवट सोडावे लागू नये, यासाठी विविध शासकीय संस्थांच्या योजनांचा लाभ अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. महाज्योती, सारथी आणि बार्टीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण व संशोधनासाठी मिळणारे अर्थसाहाय्य वाढावे, तसेच पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यक अनुदान उपलब्ध व्हावे, यासाठी अर्थसंकल्पीय तरतुदींमध्ये वाढ करण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांशी संबंधित प्रश्न सोडविण्यासाठीही सातत्याने पाठपुरावा केल्याचे वंजारी यांनी स्पष्ट केले. दिव्यांग व्यक्तींना आधुनिक उपकरणे उपलब्ध करून देणे, त्यांचे दैनंदिन जीवन अधिक सुलभ करणे आणि त्यांना शिक्षणासह विविध क्षेत्रांत समान संधी मिळवून देणे, या बाबींनाही आपण प्राधान्य दिल्याचे त्यांनी सांगितले.

**शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी सामूहिक प्रयत्नांची गरज**

शिक्षण क्षेत्रातील प्रश्न सोडविताना शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि शैक्षणिक संस्थांचे व्यवस्थापन यांच्याशी संवाद महत्त्वाचा आहे.

दैनिक सिंहवाणी वृत्त

९ दिनांक : रविवार, ११ ऑक्टोबर २०२६

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com Epaper : epaper.sinhvani.com

# नाना... मला भेटून पावला तेवढा!

श्याम पेठकर
नागपूर-ठाणे

काही माणसं भेटावीत, हे स्वप्न स्वप्नातही सत्य होऊ शकत नाही... अशी काही माणसं सहजपणे तुमच्या जवळ येतात अन् मग तुमच्या आयुष्याचा अंतरंग असा अविभाज्य भाग होऊन जातात, तेव्हा आयुष्यच एक स्वप्न होऊन जातं. नाना पाटेकरांच्या बाबत असेच झाले. नानाच्या आधी मकरंद जवळ आला. कदाचित नंतर नाना आपल्या आयुष्यात इतक्या जवळून आला आहे, हे पचवणे जड जाऊ नये म्हणून मकरंद आला असावा... मकरंद अनासपुरे माझा मित्र झाला ते मी ई-टिव्ही मराठीवर 'टिकल ते पोलिटिकल' ही मालिका मी लिहित होतो त्यावेळी. चंद्रकांत कुळकणींर्ने मला या प्रहसनात्मक मालिकेसाठी लिहिण्याची संधी दिली. त्यातून झालेली मिळकत म्हणजे दोन माणसे- मकरंद अनासपुरे आणि भारत गणेशपुरे.

या मालिकेसाठी मी दोन वर्ष महिन्यातून दोन इपीसोड असे लेखन केले. त्यात एक इपीसोड मी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवर लिहिला. त्यावेळी मकरंदचा मला फोन आला, "श्यामराव हे काय लिहून ठेवले? दोन तास झाले, शुटींग थांबले आहे..." इतकेच तो बोलला अन् मग त्याला संपर्क केला तर रींग जायची; पण तो रीसीव्ह करत नव्हता. मग मी चंदूला फोन लावला. चंदूने सांगितले की, "अगदी स्पॉटबॉय पासून सगळे सुन्न झाले आहेत. मक्या तर रडतो आहे..."

ते मकरंदच्या डोक्यात राहून गेले. नंतर तो मकरंदचा 'द मकरंद अनासपुरे' झाला. मराठीचा सुपरस्टार झाला. त्याच्या डोक्यात शेतकरी समस्या या विषयावर चित्रपट करण्याचे होते, ते आता शक्य होणार होते. त्यातून 'गोष्ट छोटी डोंगराएवढी' हा चित्रपट साकारला. मकरंदने तो मलाच लिहायला लावला... नानाचा हलकासा स्पर्श तेव्हा माझ्या आयुष्याला झाला. नाना पाटेकरांनी या चित्रपटाच्या प्रारंभी निवेदन केले पाचच मिनिटांचे... मी लिहिलेले शब्द नानाच्या आवाजात ऐकताना नेमके काय वाटले, हे आताही सांगता येत नाही. नानासारखी माणसे पेलता येण्याचीही क्षमता असावी लागते, म्हणूनही असेल कदाचित; पण माझ्या अस्तित्वाच्या वर्तुळात नाना असा धिरे धिरे येत गेला...

हा चित्रपट गाजला, माहोल झाला... मकरंदला नाना मुलासारखाच मानायचा. मात्र, मकरंदला असे म्हणण्याचे धाडस कधी झाले नाही की, नानांची भेट करून दे... ती आपोआपच व्हायला हवी. अगदी नैसर्गिक असायला हवी... ती झाली.

'गोष्ट छोटी...'ची चर्चा झाली. अगदी बाळासाहेब ठाकरे यांना खूप आवडला. त्यांनी शेतकरी समस्या कळाव्यात म्हणून हा चित्रपट बघावा, असे आवाहन त्यांच्या वृत्त वाहिन्यांच्या मुलाखतीत केले. तत्कालिन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांना मुद्दाम हा चित्रपट दाखवला. तरीही मकरंदचे समाधानहोत नव्हते. मकरंद, सयाजी शिंदे, नागेश भोसले यांनी शेतकऱ्यांची समस्या व्यवस्थेपर्यंत पोहोचावी, त्यावर काही तोडगा निघावा, या तळमळीने चित्रपट केला. मात्र, तसे होताना दिसत नाही म्हणून मकरंद अस्वस्थ होता. आत्महत्याग्रस्त कुटुंबासाठी काही करावे, असे त्याच्या डोक्यात होते. त्यासाठी मग एकदा त्याचा मला फोन आला, "श्यामराव, मी चित्रपटसृष्टीतून एक निधी गोळा करतो, आपण शेतकऱ्यांसाठी काही करू..."



नंतर नानाला हे कळले. नानाचा तेव्हा वेलकम-टू हा चित्रपट येऊ घातला होता. नाना त्याच्या चित्रपटाच्या मानधनातील एक तृतियांश रक्कम सामाजिक कामाला द्यायचा. हा त्याचा शिरस्ता होता. नानानेच मग आत्महत्याग्रस्त कुटुंबातील शेतकरी विधवा महिलांना प्रत्येक १५- १५ हजार रुपये देण्याचे ठरविले होते. बीडला तसा कार्यक्रम ९ ऑगस्ट २०१५- क्रांतिदिनला ठरला होता. मकरंदचा मला फोन आला, १० ऑगस्टचा नागपूरचा कार्यक्रम ठरला. तेव्हाचे 'जनमंच' या सामाजिक चळवळीचे अध्यक्ष आणि ॲड. अनिल किलोर सरांनी आयोजनाची जबाबदारी स्वीकारली आणि मग कार्यक्रम झाला... पुढे 'नाम'ची स्थापना झाली.

त्या कार्यक्रमाला नाना पहिल्यांदा भेटला. हॉटेल नागपूरच्या 'अशोका'मध्ये नाना थांबला होता. मी गेलो अन् नानाबद्दल जे काय ऐकले होते ते सगळेच गळून पडले. तो संतापी आहे, हेकड आहे, खूप उच्चकोटीचा कलावंत आहे म्हणून थोडा तुच्छतावादी आहे, असेच माझेही मत होते. मी नानाच्या रुममध्ये गेल्या बरोबर त्याने पहिलीच भेट असतानाही, "येऽऽ श्याम्याऽऽ" असे स्वागत केले. स्वतः सोबत बसवून घेतले. अल्पोपहार करवला.

"काय वय तुझे?"

"अठ्ठेचाळीस- पन्नास.."

"भडव्या, पोट किती सुटले आहे बघ... दोन किलोमिटर धावू शकणार नाहीस..." असे म्हटले.

नंतर नाना भेटत राहिला. 'नाम'चे काम होते. बैठका व्हायच्या दर महिन्याला पुण्यात. आम्ही त्याला जायचो. नाना अधीक कळत गेला. नानाला अगदी पहिल्या भेटीपासूनच ऐकेरीत संबोधू लागलो. नानानेही त्याला कधी आक्षेप घेतला नाही.

त्याला भीतभीतच मग मी माझे 'ऋतूस्पर्श' हे पुस्तक दिले. तो वाचेल का? वाचले तर नाही आवडले तर त्याची काय प्रतिक्रिया असेल? भीतीच होती... नंतरच्या भेटीत मी त्याला माझे पुस्तक दिल्याची आठवणही करून दिली नाही. मिटींग झाल्यावर नानाने हात धरून आतल्या छोट्या केबीनमध्ये नेले. हात घट्ट धरले... "भडव्या इतके चांगले का लिहितोस..." असे म्हणाला. खूप भरून पावले.

'नाम'च्या पलिकडे एक नाते आमच्यात निर्माण झाले. नाम मधल्या सगळ्याच 'नाम'धारींचे कुटुंब नानाला आपलेच कुटुंब वाटायचे. कुणाच्या घरी काय प्रॉब्लेम आहे, हे तो जाणीन घ्यायचा. कार्य, प्रसंग लक्षात ठेवून त्याच्या व्यस्ततेतही जाता आले नाही तरीही किमान त्याचा फोन जायचा... नागपूरच्या कार्यक्रमानंतर वर्धा आणि तिथून मग जळगावला कार्यक्रम होता. मी त्याला जाऊ शकणार नव्हतो. मी 'लोकशाही वार्ता' या दैनिकात मॅगझीन एडीटर होतो.

एक महत्त्वाचा कार्यक्रम होता. त्यात माझ्या बायकोचे पीएसव्हीटीचे ऑपरेशन होते... मी नानासमोर कार्यक्रमाबद्दल बोललो; पण बायकोच्या ऑपरेशनबद्दल नाही बोललो. मक्याला हे सांगताना नानाने ऐकले. नानाच जवळ आला, "अरे श्याम्याऽऽ सांगायचंनारे, भाग्यश्रीचे ऑपरेशन आहे ते..." काही अडचण आहे का पैशांची, असे विचारले. मी नाही, म्हणालो. नंतर कार्यक्रमांची गर्दी होती. तरीही त्याने तारीख लक्षात ठेवली. मधल्या काळात त्याचा फोन येऊन गेला. कधी आहे, कसे आहे... पीएसव्हीटी काय असते हृदयाच्या संदर्भातले, हे त्याला माहिती होते. पुण्याचे एक डॉक्टरच यातले एक्सपर्ट होते. मला वाटतं नाना त्यांच्याशी बोलला. ऑपरेशनच्या दिवशी त्याचा परस्पर माझ्या बायकोला फोन गेला, "हा भडवा काही सांगणार नाही, काही अडचण आहे का?" असे विचारले.

नाना कवीमनाचाच नव्हता तर कवीही होता. कधीमधी रात्री-बेरात्रीही त्याचा फोन यायचा. "बघ, कविता लिहिली, ऐक जमली का..." असे म्हणत कविता ऐकवायचा. एक-दोन कविता मी मोबाईल कॉलवर रेकॉर्डही करून घेतल्या होत्या.

नानाशी थेट बोलायला आवडायचे. कधी तशी भीती वाटली नाही, आपल्या स्पष्ट बोलण्याने नाना दूरावेल, असे कधीच वाटले नाही. एका बैठकीला मी गेलो नाही. जाऊ शकलो नाही. नानाने तेव्हा त्याच्या घरी सत्यनारायण केला होता. स्वतः काही पदार्थ बनविले. अगदी धोतर, बंडी, टोपी घालून या सगळ्या 'नाम'धारींना पंगतीत बसवून वाढले... त्याचेही फोटो झाले. आमच्या व्हॉट्सअप ग्रुपवर लोकांनी मिरवलेही... नानानेही मुद्दाम, 'तू आला नाहीस, बघ मुकला...' असे काहीसे चिडवायला मला एक फोटो पाठविला. 'सत्याग्रह करावा त्याने सत्यनारायण का केला?', असा प्रश्न मी त्याला मेसेजवर केला. नानाचा लगेच फोन आला, "आईचा आग्रह होता...", असे म्हणाला. "भडव्या इतके परखड- खरे बोलू नये..." असा आपुलकीचा दम भरला त्याने.

मी अचानक संपादकाची नोकरी सोडून मुंबईला शिफ्ट व्हायचे ठरविले. नानाला एकदा फोन झाला तर सांगितले. "आपल्या बळावर ये... कुणी तुला इकडे मदत करेल, अशी अपेक्षा ठेवू नकोस... कुणी मदत करत नसते, मी तर आजिबातच करणार नाही. माझ्या भरोशावर येऊ नकोस.", असे म्हणाला.

मी सहपरिवार ठाण्याला शिफ्ट झालो आणि कोरोनाची दुसरी लाट आली. सगळी कामे बंद. खूप भीती वाटली. संचित फारसे नव्हते. भयगंडाचा त्रास होऊ लागला. घरभाडे जड जाणार, असे वाटत होते. अचानक एक दिवस मकरंदचा फोन आला. "श्यामराव आपल्याला नामची सगळी कामे लिहून काढायची आहे. म्हणजे तुमच्या रसाळ अन् संपादकीय भाषेत एका एका कामाचा लेख करून ठेवायचा




आहे, त्याचे तुम्हाला मानधन द्यायचे, असे नाना गुरूंनी सांगितले आहे. हे काम करायचेच, असा नानागुरूंचा आदेश आहे.", असे मकरंद म्हणाला. 'नाम'चे काम करताना अगदी प्रवास, निवासाचाही खर्च घ्यायचा नाही, असे ठरले असताना नानाने मला अपवाद केले. काम काही खूप नव्हते, मानधन मला अतिरिक्त वाटत होते, काम पूर्ण होतपर्यंत मला पंधरा हजार रुपये महिन्याला देण्यात येणार होते. (तितकाच माझा ठाण्याच्या घराचा किराया होता!) तसे ते सहा- आठ महिने काम चालले. (नाना, मकरंद यांनी ते मुद्दाम चालविले तितका वेळ) कोरोना संपला, जगरहाटी सुरळीत सुरू झाली. मला कामे मिळू लागली मालिका, चित्रपट लेखनाची. एक दिवस मी मकरंदसोबसत तसे बोललो. मग हे काम आपोआप बंद झाले. "किती दिवस लेख लिहिण्याचे काम चालविणार श्यामराव..." असे मक्या मिश्किलपणे म्हणाला... दिवस गेले अन् एक दिवस मला साक्षात्कार झाल्यासारखे उमगले, नानाने आपल्याला अशा पद्धतीने मदत केली होती. काम काही नव्हतेच; पण थेट पैसे दिले असते तर मी घेतले नसते मदत म्हणून, म्हणून नानाने असे काम दिले. नाना किंवा मकरंद यांनी कधीच याची जाणीवही करून दिली नाही आजवर...

खूप काही सांगावे, बोलावे, असे आहे. मी कधीच नानासोबतचे फोटो समाजमाध्यमांवर मिरवले नाही. अनेक मोठी माणसे आयुष्यात येतात, त्यांचे तसे येणे, ही तुमची मिळकत नसते. त्यामुळे खूप काही कर्तृत्व केले असेही होत नाही. चालताना आपण कधीमधी एखाद्या वृक्षाच्या सावलीत थांबतो. तो त्या वृक्षाचा विशालपणा असतो. आपण ती सावली घेऊन पुढे जाऊ शकत नाही. त्या वृक्षावर आपला दावा करू नये... नाना सारख्याचे आयुष्यात येणे, हे त्या सावलीदार वृक्षासारखे असते. ती सावलीही तुमची नसते अन् विशाल वृक्षाचा डेरेदार घेरही तुमचा नसतो... अशा मोठ्यांचे जसे तुमच्या आयुष्यात येणेही तुमचे नसते तसेच त्यांचे जाणेही केवळ तुमचे नसते. त्यांच्यामुळे तुमची उंची वाढत नाही अन् तुमचे अस्तित्वही तुमच्या नसण्यानंतरही सार्वजनिक आठवाचे केंद्र व्हावे दीर्घकाळ, असे होत नाही. ते तुमच्या कर्तृत्वानेच होत असते. नानांसारख्याचे तुमच्या आयुष्यात येणे सार्थकी तेव्हाच लागते जेव्हा तुम्ही तुमचा कुणी डीपी ठेवावा, अशा उंचीवर जाऊ शकाल.

नानासारखी माणसे आयुष्यात येताना रोप घेऊन येतात तुमच्यासाठी आणि ते जाताना तुम्ही त्या रोपाचा वृक्ष करून द्यावा अश त्यांची मूक मागणी असते... अशी मागणी करून नाना गेला आहे. 'मी नानाच्या किती जवळचा होतो.' हे मिरविण्यात काही अर्थ नाही. त्याने दिलेल्या रोपाचा वृक्ष करता येईल का, याचा विचार करतो आहे. त्यानेच पार थकवा आला आहे.

**- ज्येष्ठ संपादक, लेखक**

# "नाना,अवतारी नाना" आता अखेरच्या आठवांत..!

दिनकर रा. मडकवाडे
९४२३४१८१६०

"२५ रुपयात मुंबईत तेरा वषार्चा पोरगा पोस्टर रंगविणारा, अभिनयाचा बादशाच ते शेतीची आवड अन् शेतकऱ्याच्या सुखादुखात बांधावरचा नाना,(विश्वनाथ) पाटेकर अखेर आठवांचा ठेवाच उरला..!"

नानांनी शेतकऱ्याच्या कठीण काळात, दुःखात तसेच सर्वांच्या लोकहीतार्थात सहभाग घेण्यासाठी, नाम फाउंडेशनची स्थापना नाना व मकरंद या दोघांनी सप्टेंबर २०१५ ला केली. तन,मन,धन सर्वप्रकारचे लोकसहकार्य त्यांना लाभले. नाम फाउंडेशनचे लोकहितार्थ कार्य वेगात आले, त्यासाठी "दशकपूर्ती स्नेह मेळावा" १४ सप्टेंबर २०२५ पुण्यात साजरा करण्याचे ठरले.

याच काळात, चित्रकार मनिष रामटेके मु. सोनोली ता.काटोल जि. नागपूर. जेमतेम सामान्य कुटुंबातला. पण नानांचा फॅन होता. नाम फाउंडेशनच्या लोकहितार्थ "दशकपूर्ती कार्यला आपण नानांना काय सस्नेह भेट ध्यावी. या विचारातून, नाम फाउंडेशनच्या लोकहितार्थ कायार्ला साजेस अस नाना-मकरंदचे एकत्र चित्र मनिषने काढले. आणि माझे कडून (दिनकर मडकवाडे) त्या चित्राला व त्यांचे लोकहितार्थ कार्यास अनुसरुण नाना-मकरंद यांच्यावर काव्य गझल लिहून घेतली. असे चित्र व कविता सलग पोस्ट इस्टाग्रामवर मनिषने टाकली. या चित्राला बरीच प्रसिद्धी मिळाली. हे काही वेळाने नानाच्याही लक्षात आले. अन् नानांनी चित्रकार मनिषशी संपर्क केला. आणि मनिष सारख्या सामान्य माणसाला नाम फाउंडेशनच्या दशकपूर्ती सोहळ्याचे निमंत्रण नानांनी दिले. या दशकपूर्ती भव्य दिव्य सोहळ्यात, नाना-मकरंद या दोघांना आपण काय भेट ध्यावी या विषयी चित्रकार मनिष व मी आम्हा दोघांत ठरले की,नाना-मकरंदच्या चित्राचे दोन पोस्टर करुन दोघांनाही स्नेह भेट ध्यायचे. आपण दोघेही नाम फाउंडेशनच्या दशकपूर्ती स्नेह मेळाव्यात पुणेला हजर राहू असेही ठरले. पण,माज्या प्रकृती मुळे चित्रकार मनिष एकटाच १४-९-२०२५ ला सकाळी १० वा सुरु होणाऱ्या कार्यक्रम स्थळी, गणेश कला क्रीडा मंच स्वारगेट पुणे येथे पोहचला. आदल्या दिवसापासून सर्वांची, सर्व सोयीयुक्त व्यवस्था पुण्यात करण्यात आली होती. या स्नेह मेळाव्याला मान्यवर मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार, उदय सावंत, चंद्रकांत पाटील यांचे प्रमुख उपस्थितीत हा स्नेह मेळावा पार पडला. अशा या स्नेह मेळाव्यात नानांनी माझा (चित्रकार मनिषचा) सत्कार केला. मी नानांना चित्र व गझल समावेश असलेले पोस्टर स्नेह भेट




दिले. त्यावेळी नानांनी दिनकर सर कुठे आहेत त्यांनी कविता खूप चांगली लिहली.मी म्हटले ते प्रकृतीमुळे आले नाही. नानांनी सत्कारात माझे पाठीवर थाप देऊन,पुढे लढण्याची मला उमेद दिली. नानांचे हे सामान्यत्व अजमावून मलाही आनंदी गहिवर आला. नानाची उंची काय अन् मी कोठे..? क्षणात मी कोठून आलो याचे भान विसरलो. इतकी नानांची ती आपुलकीची पाठीवरची थापा स्वमनाशी बोलू गेली.

नाम फाउंडेशन दशकपूर्ती स्नेह मेळाव्यात नाना मकरंद भाषणात बोलून गेले की,आमच्या या वाटचालीत अनेक सबळ हातांनी माणूसकीच्या या यज्ञात मोठे योगदान दिले. हा मानवतेचा यज्ञ असाच अखंडपणे चालत राहिल याशी नाम फाउंडेशन कटीबद्ध आहे. याची ग्वाही सर्वांच्यावतीने देतो, ही मानवतेची आपुलकी नाना-मकरंद या जोडीत दिसून आली.

नानांनी मला कौटुंबिक वागणूक देऊन परतीचे वेळी नागपूर ते पुणे ये-जा चा खर्च दिला. नानांचे थोरपण मी त्यांचे फिल्मी पडद्यावर पाहिले, टी. व्ही. मुलाखात, वाचनातून नाना मला खुप आवडत होते. नाना व त्यांचे हस्ते माझा सत्कार ही प्रत्यक्ष स्नेह भेट अवर्णनीय, अविस्मरणीयच ठरली. मी खुशीने स्वगावी पोहचलो.एक वर्षांनी पण, ती ७-१०-२०२६ ची काळरात्र अत्यंत दुःखद बातमी सकाळी ५:२० वा. देऊन गेली. नाना आता आपल्यात नाही राहीले. हे ऐकून गहिवरुन आले, अश्रू अनावर झाले. खुप रडलो मनसोक्त रडलो. पण अजूनही त्या नानांच्या अत्यंत दुःखद बातमीवर विश्वास बसत नाही.

पण, नानाची ही माझी सत्कार स्नेहभेट प्रथम अन् शेवटचीच ठरली.

नानाच्या लोकहितार्थ कार्यस साजेशा काव्य ओळीः-

अखेरच्या श्वासा दे,<br>
असीम जनसेवा..<br>
मीही होतो तुझ्या,<br>
पुजेचा कापूर देवा..<br>
कर्माची सांच कधी,<br>
ना शिवली मनास,<br>
मैत्री भाव जपला,<br>
मी अंतरीचा ठेवा..<br>
जाळले आयुष्याला,<br>
मी जनसेवेत त्या,<br>
समईत जळत,<br>
जशी पणती दिवा..<br>
जे,काही मी केले,<br>
त्याशी सम्यक कर्मात,<br>
अंधारातला तो उजेड,<br>
मी एक काजवा..<br>
मीही होतो तुझ्या,<br>
पुजेचा कापूर देवा..<br>
अखेरच्या श्वासा दे,<br>
असीम जनसेवा..

- कवी दिनकर मडकवाडे

पडद्यावरच्या, अभिनेत्या पेक्षाही नाना जनसामान्यांचा लोकनायक होता. पडद्यावर कठोर भूमिका साकारणारा, नाना मनाने खूप हळवा होता. नाना पाटेकरांच्या आयुष्यात मात्र प्रेम, संघर्ष, विरह, दुःख आणि कृतज्ञतेची वेगळीच कहाणी होती. पण नानांनी ती जनसामान्यांत वागतांना कधीच दिसू दिली नाही. बिनधास्त बोलणारा आमचा नाना आता आमच्यात राहला नाही. मन कस गहिवरु येतं अश्रू श्रध्दांजली तुमचे चरणी अर्पण करतो नाना...!

# 'एआय युग' दिवाळी अंकासाठी साहित्य पाठविण्याचे आवाहन

***इंटरएक्टिव्ह एआय विचारधारेवर आधारित अभिनव दिवाळी अंक; साहित्यिक, एआय अभ्यासक आणि व्यंगचित्रकारांना सहभागाची संधी***

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (Artificial Intelligence – AI) झपाट्याने विकसित होणाऱ्या तंत्रज्ञानाचा मानवी जीवन, साहित्य, कला, संस्कृती, पत्रकारिता आणि समाजव्यवस्थेवर होणारा परिणाम समजून घेण्याच्या उद्देशाने 'एआय युग' हा इंटरएक्टिव्ह एआय विचारधारेवर आधारित अभिनव दिवाळी अंक २०२६ प्रकाशित करण्यात येत आहे. या अंकासाठी साहित्यिक, लेखक, विचारवंत, पत्रकार, विविध क्षेत्रांतील एआय अभ्यासक, तंत्रज्ञानतज्ज्ञ आणि व्यंगचित्रकार यांनी आपले साहित्य पाठवावे, असे आवाहन रवींद्र मालुसरे (संपादक) भानुदास साटम (संकल्पना) यांनी अंकाच्या संपादकीय मंडळाच्या वतीने केली आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता हे केवळ तंत्रज्ञानापुरते मर्यादित नसून ते मानवी विचार, सर्जनशीलता, अभिव्यक्ती आणि भविष्यातील सामाजिक बदलांशी जोडलेले महत्त्वपूर्ण माध्यम बनत आहे. या पार्श्वभूमीवर 'एआय युग' दिवाळी अंकातून एआयच्या संधी, आव्हाने, मयार्दा, नैतिकता, मानवी बुद्धिमत्ता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांच्यातील नाते, तसेच साहित्य आणि कलाक्षेत्रातील नव्या शक्यता यांवर विचारमंथन घडवून आणण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. या अंकासाठी एआय आणि मराठी भाषा, साहित्यनिर्मितीतील कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, पत्रकारितेतील एआयचे बदलते स्वरूप, शिक्षण, उद्योग, शेती, आरोग्य, प्रशासन, सामाजिक माध्यमे, रोजगार, डिजिटल संस्कृती, मानवी मूल्ये आणि भविष्यातील तंत्रज्ञान अशा विविध विषयांवरील वैचारिक लेख, अनुभवकथन, संशोधनपर लेख, मुलाखती, ललित लेखन आणि व्यंगचित्रे आमंत्रित करण्यात येत आहेत. एआयच्या सकारात्मक उपयोगांसोबतच त्यातून निर्माण होणारे प्रश्न, धोके आणि सामाजिक परिणाम यांचे चिकित्सक विश्लेषण करणाऱ्या लेखनालाही या अंकात महत्त्व दिले जाणार आहे.

'इंटरएक्टिव्ह एआय' या संकल्पनेच्या माध्यमातून वाचकांना केवळ माहिती देण्यापलीकडे जाऊन नव्या तंत्रज्ञानाशी संवाद साधण्याची, प्रश्न विचारण्याची आणि स्वतंत्रपणे विचार करण्याची प्रेरणा देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख हेतू आहे. पारंपरिक दिवाळी अंकाच्या साहित्यिक समृद्धीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत मराठी वाचकांसाठी एक वेगळा वैचारिक मंच उपलब्ध करून देण्याचा या अंकाचा प्रयत्न आहे.

एआय तंत्रज्ञानाचा अभ्यास करणारे तज्ज्ञ, तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यावसायिक, साहित्यिक, पत्रकार, संशोधक, शिक्षक, विद्यार्थी, डिजिटल माध्यमांतील निमार्ते आणि व्यंगचित्रकार यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा. आपल्या लेखनातून, अनुभवातून, संशोधनातून आणि कलात्मक अभिव्यक्तीतून एआय युगाचे विविध पैलू उलगडणारे साहित्य पाठवून या अभिनव उपक्रमात योगदान द्यावे असे आवाहन करण्यात आले आहे.

साहित्य पाठविण्याची २५ ऑक्टोबर २०२६ अंतिम तारीख असून साहित्य पाठविण्याचा ई-मेल - aidiwali2026@gmail.com अधिक माहितीसाठी ९३२३११७७०४ यावर संपर्क साधावा.